cmyk

## संपादकीय

### महाराष्ट्रात निवडणूकिचे पडघम सुरू...

एका नामांकित व्यावसायिक कंपनीने विधानसभा निवडणुका तोंडावर असताना महाराष्ट्रातील जनमताचा सर्वे करुन त्याचे तपशील जाहीर केले आहेत. हे तपशील सांगतात, महाआघाडीला सुमारे १६० जागा मिळतील व काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट यांची महाविकास आघाडी सत्तेवर येईल. अर्थात हे अंदाज आहेत ते निवडणुकीपर्यंत बदलू शकतात आणि अशा अंदाजांचे काय होते हे लोकसभा निवडणुकीच्यावेळी दिसून आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष निकाल हेच खरे.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### केंद्र सरकारने केला ॲग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंडचा विस्तार

नवी दिल्लीः केंद्र सरकार कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी ॲग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड म्हणजे एआयएफ राबवते. यामध्ये कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधासाठी बुधवारी (दि.२८) १ लाख कोटी रुपयांच्या योजनेचा अधिक विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकी याबद्दल निर्णय घेण्यात आला आहे. एआयएफच्या अंतर्गत कृषी क्षेत्रातील अर्थपुरवठा योजनेला अधिक आकर्षक आणि प्रभावशाली करण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे, असे अधिकृत निवेदनात सांगण्यात आले आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१२९ | शुक्रवार दि.३० ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


# पुन्हा संधी दिल्यास पुढील पाच वर्षे शेतीला मोफत वीज अन् लाडक्या बहिणींना ओवाळणी देणार

## बीड येथील जन सन्मान यात्रेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला शब्द

बीड । प्रतिनिधी

**सर्वसामान्यांचे हे सरकार असून आम्ही लाडक्या बहिणींसाठी योजना सुरू केली. आतापर्यंत १ कोटी २० लाख बहिणींच्या बँक खात्यात ३ हजार रुपये जमा झाले. शेतकऱ्यांना आम्ही कधीही वाऱ्यावर सोडणार नसून पुढचे वीज बील द्यायचे नाही आणि मागचे भरायचे नाही, अशी आम्ही योजना सुरु केली आहे. कांदा निर्यात बंदी आता होणार नाही. यापुढेही आम्हाला आशिर्वाद द्या, आम्ही पुढील ५ वर्षे लाडकी बहिण योजना, शेतीला मोफत वीज देण्याचा संपुर्ण महाराष्ट्रातील जनतेला बीडमधून शब्द देतो, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जन सन्मान यात्रेत बोलताना जाहीर केले. यावेळी व्यासपीठावर कृषीमंत्री धनंजय मुंडे, खा. सुनिल तटकरे आदि उपस्थित होते.**





उपमुख्यमंत्री अजित पवार हे सध्या राज्यात जन सन्मान यात्रेच्या माध्यमातून लाडक्या बहिणी आणि शेतकरी, तरुणांशी संवाद साधत आहेत. गुरुवारी दुपारी अजित पवार हे बीडमध्ये आले, डॉ. योगेश क्षीरसागर यांनी ◀◀ पान २ वर



### बीडच्या आमदाराला सरळ करण्यासाठी संधी द्या–डॉ. योगेश क्षीरसागर

आपल्या प्रस्ताविकात बोलताना डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले, अजितदादा तुम्ही इथल्या आमदाराला तिकीट दिले, निवडूण आणले पण त्यांनी तुम्हाला आणि जनतेलाही सोडले आहे. बीडच्या आमदाराला सरळ करण्याची मला यावेळी विधानसभा निवडणुकीत संधी द्या, अशा स्वरुपात डॉ. योगेश क्षीरसागर यांनी अजित दादांकडे बीडच्या उमेदवारीबाबत शब्द टाकला. बीड शहरातील विविध समस्यांसह मतदार संघातील महत्वाच्या प्रश्नाकडे अजित दादांचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी यावेळी लक्ष वेधून घेतले.



### डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांची अजितदादांशी चर्चा

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पत्नी डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी बीडमधील जनसन्मान यात्रेच्या नियोजनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. कार्यक्रम सुरू झाल्यानंतर सारिकाताई यांनी अजितदादा यांच्याशी महिलांच्या विविध प्रश्न संदर्भामध्ये चर्चा केली. बीड मतदार संघामध्ये महिला सक्षमीकरणा संदर्भात पक्षाच्या वतीने महत्त्वपूर्ण काम करण्यात येत असल्याचेही यावेळी त्यांनी दादांच्या निदर्शनास आणून दिले.

## बीड जिल्ह्यातील ६ जागा महायुती जिंकणार–धनंजय मुंडे

### डॉ.योगेश क्षीरसागरांसाठी धनुभाऊ मैदानात; राष्ट्रवादी चार जागा लढणार

यावेळी बोलताना कृषीमंत्री धनंजय मुंडे म्हणाले, गेल्या वेळी बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४ जागा निवडूण आल्या होत्या. एकजण तिकडे गेला. तरीही यावेळी सुध्दा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट जिल्ह्यात ४ जागा लढवणार असून चारही जागेवर आम्ही जिंकून येऊ. तसेच जिल्ह्यात महायुतीचे ६ आमदार यावेळी सुध्दा होतील असा शब्द दादा मी तुम्हाला सर्वांच्या वतीने देतो, असे म्हणाले.

महायुतीमध्ये बीडच्या जागेवरुन सध्या रस्सीखेच सुरु आहे. शिवसेना जिल्हप्रमुख अनिल जगताप यांनी ही जागा आमच्याकडेच राहणार असल्याचे अनेकवेळा सांगितले असून दुसरीकडे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी त्यादृष्टीने जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. योगेश भैय्यांसाठी पालकमंत्री धनंजय मुंडे हे आता मैदानात उतरले असून बीडच्या जागेवर अजित पवार आणि अनिल जगताप यांच्यासमोर दावा केला आहे. त्यामुळे बीडची जागा अजित पवार गटाकडेच जाईल, असे संकेत आहेत. त्यामुळे बीडच्या जागेवरुन महायुतीत रणसंग्राम होण्याचे चिन्ह आहेत.



### ठेवीदारांकडून ताफा अडवण्याचा प्रयत्न

जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट, साईनाथ मल्टीस्टेट यासह बऱ्याच मल्टीस्टेटला सध्या कुलूप लागल्याने हजारो कोटी रुपयांच्या ठेवी अडकल्या आहेत. त्यामुळे स्वाभीमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन उबाळे यांच्यासह काही ठेवीदारांनी अजित पवारांचा ताफा शिवाजी चौकात येताच तो अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेत बाजूला केले.

### डॉ. क्षीरसागरांच्या नियोजनावर अजितदादाही खूश

डॉ. योगेश क्षीरसागर आणि डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी जन सन्मान कार्यक्रमाची गेल्या अनेक दिवसापासून तयारी सुरु केली होती. दिवसरात्र ते कार्यक्रमाच्या तयारीच्या कामाला लागले होते. त्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाल्याचे दिसून आले. अजित दादा सुध्दा डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या नियोजनावर खूश असल्याचे दिसत होते.

### स्व.मुंडे साहेबांच्या आठवणींना उजाळा

अजित दादांनी आपल्या भाषणामध्ये स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या नावाचा विशेष उल्लेख केला. मुंडे साहेबांनी बीड जिल्ह्यासाठी खूप काही केले. त्यांनी कधीही भेदभाव केला नाही, असे सांगून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला.

### आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून घोषणाबाजी

महिला आत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या महिला कार्यकर्त्यांनी शिवाजी महाराज चौकात अजित पवार यांच्या ताफ्यासमोर जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी महिला कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटकाव करीत ताब्यात घेतले.

## तुम्ही बाळासाहेब आजबे यांच्या पाठीशी रहा, बाकीचे माझ्यावर सोडा

### आष्टीत आजबेनी अजित पवारांचे भव्य स्वागत करुन आपली ताकत दाखवली

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्रात इथून पुढे विरोधकांकडून काहीही वावड्या उठवल्या जातील त्यावर विश्वास न ठेवता येणाऱ्या विधानसभेत महायुतीचे सरकार आणण्यासाठी आपण घड्याळ चिन्हा समोरील बटन दाबून महायुतीच्या उमेदवाराला विजयी करायचे आहे,तुम्ही कामाची चिकाटी असणारे कणखर आमदार बाळासाहेब आजबे यांच्या पाठीशी उभे राहा बाकीचे मी पाहून घेतो त्याची काळजी तुम्ही करू नका असे स्पष्ट विधान राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी आष्टी येथे जन सन्मान यात्रेदरम्यान बोलताना केले..राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ◀◀ पान २ वर

### कार्यक्रम घ्या पण वाहतुकीचे कोणी बघायचे?

आ. बाळासाहेब आजबे यांनी खऱ्या अर्थाने अजित दादांचा कार्यक्रम घेऊन आपली ताकद दाखवली पण या कार्यक्रमामुळे आष्टीकरांना नाहक त्रास सहन करावा लागला. आ. आजबे यांनी बीड–नगर या मुख्य रस्त्यावरच अजितदादांचे जंगी स्वागत केले. त्यामुळे जवळपास दिड तास वाहतुक ठप्प झाली होती. यामुळे अनेकांना मोठा त्रास सहन करावा लागला. कार्यक्रम जरुर घ्या पण त्या अगोदर वाहतुकीचे बघा असे म्हटले जात आहे.



### राहुल गांधी पुन्हा भारत जोडो यात्रा काढणार

नवी दिल्लीः राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर मार्शल आर्टचा व्हिडिओ पोस्ट केला. या व्हिडीओमुळे ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ०.५० क्विंटल | २,४५० | २,४५० | २,४५० |
| ज्वारी/हायब्रिड : ५७.५० क्विंटल | २,००१ | २,५५१ | २,२४७ |
| मूग : ४६.०० क्विंटल | ७,४०१ | ८,१५१ | ७,८७३ |
| तूर : ०.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| उडीद : ५.०० क्विंटल | ७,९०० | ७,९०० | ७,९०० |
| बाजरी:१२.०० क्विंटल | २,४३१ | २,५५० | २,४९४ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,९०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ३२.५० क्विंटल | ४,१०० | ४,२५० | ४,१८५ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ७,३१० | ७,३११ | ७,३१० |

### बीड जि. प. सीईओ म्हणून सतिशकुमार खडके यांची नियुक्ती

#### राज्यातील ७ उच्च पदस्थ अधिकाऱ्यांच्या बदल्या

बीड । प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसापुर्वी जि. प. चे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांची पदोन्नतीवर बीड जिल्हाधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर आता बीड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सतिशकुमार खडके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या बरोबर राज्यातील इतर ६ अधिकाऱ्यांच्याही बदल्या करण्यात आल्या आहेत.**

तत्कालीन सीईओ अविनाश पाठक यांची बीड जिल्हाधिकरी म्हणून बदली झाल्यावर संगितादेवी पाटील यांच्याकडे सीईओचा अतिरिक्त पदभार देण्यात आला होता. आता बीड झेडपीला कायमस्वरुपी सीईओ मिळाला असून सतिशकुमार खडके यांची नियुक्ती शासनाने केली आहे. तसेच इतर ६ अधिकाऱ्यांच्याही शासनाने बदल्या केल्या आहेत. यामध्ये अभिनव गोयल यांची हिंगोली जिल्हाधिकारी, विनायक महामुनी यांची जि.प. नागपुर सीईओ, सौम्या शर्मा–चांडक यांची नागपुर स्मार्ट सिटी सीईओ, मनिषा आव्हाळे यांची स्मार्ट सिटी, पुणे सीईओ, कुलदीप जंगम यांची सोलापुर जि.प. सीईओ तर प्रदिपकुमार डांगे यांची ◀◀ पान २ वर

## कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी शेतीवर आधारित उद्योग उभारावेत–आ.पंकजाताई मुंडे

### प्रत्येक मतदारसंघात कृषी प्रदर्शन भरवुन त्यास पाच लाख रुपये अनुदान द्यावे – मा. आ.भिमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी कृषीवर आधारित उद्योग उभारावेत. जे पेरले तेच उगवते. गहू, ज्वारी, बाजरी पेरली तर गहू, ज्वारी, बाजरीच ऊगवणार आहे त्याप्रमाणे चांगले विचार पेरले तर चांगले विचार उगवतील. विषारी विचार दिले तर विषारी विचारच निर्माण होतील . मा. आ.भीमराव धोंडे यांनी शांत संयमी व सुंदर आणि ◀◀ पान २ वर




#### क्षणचित्रे:–

*✻ सांगली येथील ४१ लाख रुपये किंमतीच्या खिलार सोन्या जातीच्या बैलाच्य सभोवताली उभे राहून राशीन व चिखली येथील ५१ कलाकारांनी एकाच वेळी हालगी वाजवत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.*

*✻ कार्यक्रम स्थळी प्रमुख पाहुणे उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री ना. धनंजय मुंडे, महाराष्ट्राच्या रणरागिणी लोकनेत्या आ पंकजाताई मुंडे, मुख्य आयोजक मा. आ. भिमराव धोंडे, पोपटराव पवार, समारोपाचे पाहुणे राज्य वारकरी संप्रदायाचे हभप प्रकाश महाराज बोधले, गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांचे लक्ष वेधून घेणारे बॅनर लावण्यात आले होते.*

*✻ कृषी प्रदर्शनाच्या स्थळी प्रवेश केल्यानंतर महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा आकर्षक पुतळा ठेवण्यात आला होता. मान्यवरांसह प्रत्येक शेतकरी व इतर शिवाजी महाराजांना अभिवादन करुन पुढे जात होता.*

### महाराजांच्या पुतळाप्रकरणी नौदलाची चौकशी समिती

मुंबईः राजकोट किल्ला येथील छत्रपती शिवरायांच्या पुतळा कोसळण्याच्या घटनेची चौकशी करण्यासाठी भारतीय नौदलाच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी, तांत्रिक तज्ज्ञ यांचा समावेश असलेली एक संयुक्त तांत्रिक समिती नियुक्त करण्यासंदर्भात केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले.

मराठा नौदल आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सागरी संरक्षण आणि सुरक्षेच्या वारशाचा गौरव करण्याच्या उद्देशाने, तसेच आधुनिक भारतीय नौदलासमवेतचा ऐतिहासिक दुवा अधोरेखित करण्यासाठी सिंधुदुर्गात प्रथमच आयोजित नौदल दिनाच्या समारंभाचा भाग म्हणून ०४ डिसेंबर ◀◀ पान २ वर

## उद्यापासून पावसाचा जोर वाढणार

### ठिकठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील काही भागात सध्या पावसाच्या जोरदारी सरी पडत आहेत. पण बहुतांशी भागात पावसाची विश्रांती दिसत आहे. ऊन पावसाचा खेळ सुरु आहे. हवामान विभागाने पुढील २ दिवसांमध्ये राज्याच्या अनेक भागात जोराचा पाऊस सुरु होईल, असा अंदाज व्यक्त केला आहे.**

सध्या गुजरातमधील सौराष्ट्र आणि कच्छ भागात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. तर मान्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा सौराष्ट्र आणि कच्छपासून उदयपूर, शिवपुरी, सिधी, अंबिकापूर, पुरी ते आग्नेयभागात बंगालच्या उपसागरापर्यंत विस्तारला आहे. तसेच दक्षिण गुजरात ते उत्तर केरळ किनारपट्टीपर्यंत किनाऱ्याला समांतर कमी दाबाचा पट्टा आहे.

महाराष्ट्राच्या अनेक भागात सध्या पावसाची उघडीप दिसत आहे. पण दोन दिवसात राज्यात पावसाला पुन्हा सुरुवात होण्याची चिन्हे आहेत. हवामान विभागाने शनिवारपासून राज्यात काही भागात पाऊस वाढेल, असा अंदाज दिला आहे. विदर्भातील



सर्वच जिल्हे तसेच मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील सातारा, पुणे, नाशिक जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट हवामान विभागाने दिला. शनिवारी विदर्भातील बुलडाणा, ◀◀ पान २ वर

cmyk

cmyk



अग्रलेख

# महाराष्ट्रात निवडणूकिचे पडघम सुरू...

एका नामांकित व्यावसायिक कंपनीने विधानसभा निवडणुका तोंडावर असताना महाराष्ट्रातील जनमताचा सर्वे करुन त्याचे तपशील जाहीर केले आहेत. हे तपशील सांगतात, महाआघाडीला सुमारे १६० जागा मिळतील व काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट यांची महाविकास आघाडी सत्तेवर येईल. अर्थात हे अंदाज आहेत ते निवडणुकीपर्यंत बदलू शकतात आणि अशा अंदाजांचे काय होते हे लोकसभा निवडणुकीच्यावेळी दिसून आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष निकाल हेच खरे. तरीपण राजकीय नेत्यांना धोरणे ठरविताना, जागावाटप करताना, आतली टांग मारताना आणि व्यूहरचना करताना असे जनमत चाचणी अहवाल महत्त्वपूर्ण ठरत असतात.

लोकसभा निकालानंतर महाराष्ट्रात भाजपा आणि महायुतीने वेगळी व झपाट्याने पावले उचलायला प्रारंभ केला आहे. लाडकी बहीण आणि शेतीला मोफत वीज हे कळीचे मुद्दे ठरावेत अशी योजना करण्यात आली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप यातील अंतर कमी करुन काही ज्येष्ठ स्वयंसेवकास प्रत्येक मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली आणि पंतप्रधानांच्या उपस्थितीत बचत गटाच्या महिलांचा तगडा मेळावा भरवून लाडकी बहीण योजना विस्तारण्यात आली. इतके करुनही महाराष्ट्राचा मूड दिसतो आहे तो महाआघाडी १६० जागा जिंकणार असा. ओघानेच नव नवे पवित्रे घेतले जात आहेत आणि सत्तेत आपण असू आणि मुख्यमंत्रीपद आपणासच मिळाले पाहिजे यासाठी सर्वच पातळीवर बेत रचले जात आहेत. पाच तारखेला सांगली जिल्ह्यात कडेगांव येथे दिवंगत नेते डॉक्टर पतंगराव कदम यांच्या स्मारकाचे उद्घाटन आणि जनमेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला राहुल गांधी, सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले, जयंत पाटील आदी प्रभूती हजर राहणार आहेत. एका अर्थाने हा मेळावा महाआघाडीचा प्रचार मेळावा तर होणार आहेच. जोडीला डॉ. विश्वजित कदम यांचे नेतृत्व उद्याच्या स्पर्धेत अग्रभागी नेण्यात महत्त्वाची भूमिका निभावणार आहे. विश्वजीत कदम काँग्रेस पक्षाशी व गांधी कुटुंबाशी एकनिष्ठ आहेत. पक्षासाठी प्रसंगी ते सांगली पॅटर्न करतात पण हित काँग्रेसचे, महाआघाडीचे साधतात हे त्यांनी दाखवून दिले आहे.

महाआघाडीत संजय राऊत आणि उद्धव ठाकरे महाआघाडीचा चेहरा जाहीर करा आणि सत्ता आली तर मुख्यमंत्री कोण हे स्पष्ट करा यासाठी आग्रही आहेत. उद्धव ठाकरे यांना मोठा भाऊ व मुख्यमंत्री म्हणून संधी जाहीर करणार नसाल तर सगळा विरोध आणि सर्व २८८ उमेदवार डोक्यावर घेऊन राज्यभर नाचायची गरज काय असा सवालही त्यांच्या पक्षाचे पदाधिकारी विचारताना दिसत आहेत. उद्धव ठाकरे दिल्लीवारी करुन आले पण काँग्रेसने त्यांना महाआघाडीचे मुख्यमंत्री असे प्रोजेक्ट करायला तयार नाहीत. ओघानेच उद्धव ठाकरे असोत, अजितदादा पवार असोत ही मंडळी आपल्या शिवाय राज्यात सत्ता स्थापन होणार नाही यासाठी खेळी करणार हे उघड आहे. शरद पवार आजवर तेच करत आले आहेत. त्यांना सुप्रिया सुळे यांना मुख्यमंत्री करायचे आहे, भाजपकडून विशेषत: संघ परिवाराकडून नितीन गडकरी यांना महाराष्ट्रात आणले जाऊ शकते आणि देवेंद्र फडणवीस दिल्ली दरबारी पाठवले जातील एकुणच निवडणूकीपूर्वी नदीतून भरपूर पाणी वाहिल हे स्पष्ट आहे. एकमात्र दिसते आहे सर्वत्र बहुरंगी लढती होतील. मराठा आरक्षण आणि लाडकी बहीण हे गेमचेंजर मुद्दे बनतील. निवडणूक पूर्व अलायन्स आणि नंतरचे धोरण यात कोण कुणाचा कायमचा मित्र नाही हे दिसून येईल आणि तुकड्या तुकड्यात पक्ष, संघटना एकत्र येऊन सत्ता हिसकावत राहतील. जरांगे काय करतात की देवेंद्र फडणवीस यांना घरी बसवणे हाच त्यांचा हेतू राहणार, ते सर्वत्र अपक्ष उमेदवार उभे करणार की कुणाशी हातमिळवणी करणार हे बघावे लागेल. ओबीसी समाज विशेष करुन धनगर, माळी, वंजारी अस्वस्थ आहेत. हा समाज आणि मागास, इतर मागास समाज ओबीसी आरक्षण बचाव परिषदांच्या माध्यमातून एकवटतांना दिसतो आहे. तर मुस्लीम समाज एक गठ्ठा भाजपा विरोधी भूमिकेत आहे. ओघानेच महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा, समरसता आणि गावगाडा अडचणीत आले आहेत. या सर्व स्थितीला शरद पवार आणि त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस जबाबदार आहे असे सांगत राज ठाकरे महाराष्ट्र पिंजून काढत आहेत. महाराष्ट्रात लाडकी बहीण गाजत असतानाच महिला, मुली यांच्यावरील अत्याचार, बलात्कार अशी प्रकरणे पाठोपाठ पुढे येत आहेत. सिंधुदुर्गमधील महाराजांचा पुतळा पडणे हे महायुतीला भारी पडताना दिसत आहे. एकूणच रोज नवनवे चित्र पुढे येत आहे आणि बुडत्याचा पाय खोलात जातो आहे. महापुरुषांचा पुतळा उभा करताना आम्ही पुरेशी काळजी घेणार नाही. महिलांची सुरक्षा नीट ठेवणार नाही आणि सवंग जातीपातीचे उथळ आणि राज्यहिताला बाधक भूमिका घेणार असू तर लोकांना नवे पर्याय शोधावे लागतील.

## जेपीसी बँकेस काही अडचण असल्यास सहकार्य करणार-खा.डॉ.कल्याणराव काळे

जालना । प्रतिनिधी

**दि जालना पिपल्स्? को-ऑप. बँकेच्या सदर बाजार येथील मुख्य कार्यालयास जालना जिल्हयाचे नवनिर्वाचित खासदार मा. डॉ. श्री. कल्याणरावजी काळे यांनी सदिच्छा भेट दिली. सर्वप्रथम बँकेचे चेअरमन संजय मुथा यांनी त्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पहाराद्वारे स्वागत केले. यानंतर संचालक सतिश पंच यांनी जयप्रकाश चव्हाण, संचालक सुभाष वाघमारे यांनी विजय चौधरी यांचे, संचालक हितेंद्र शाह यांनी मोरेश्वर दळवी यांचे तर संचालक अनुराग अग्रवाल यांनी राष्ट्रवादीचे नेते बबलु चौधरी यांचे पुष्पहारे स्वागत केले.**



यानंतर महाव्यवस्थापक विजय जोशी यांनी बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी संचालक सतिश पंच यांनी जालना शहरातील व्यापारी, नागरीकांचे प्रश्न व समस्या सांगितल्या. यावेळी मनोगत व्यक्त करतांना बँकेचे चेअरमन संजय मुथा यांनी नवनिर्वाचित खा. डॉ. कल्याणरावजी काळे यांनी बँकेस लोकसभेच्या निवडणुकीनंतर प्रथमच भेटी दिली त्याबद्दल त्यांचे स्वागत व आभार व्यक्त करून खा.डॉ. कल्याणरावजी काळे हे आपल्या कुशल नेतृत्वाने व सर्वांना सोबत घेऊन चालण्याचे स्वभावाने जालना जिल्हयाचा विकास करतील तसेच बँकेचे अडी-अडचणीचे वेळी खासदार साहेब बँकेस मार्गदर्शन व सहकार्य करतील याची खात्री असल्याचे नमुद केले. सत्काराला उत्तर देतांना खा. डॉ. कल्याणरावजी काळे यांनी खासदार म्हणुन निवडून दिल्याबद्दल सर्वाचे आभार व्यक्त करून बँकेच्या संचालक / व्यापारी यांनी जालना शहराचे समस्या मांडल्या त्या समस्या / प्रश्नांची सविस्तर माहिती घेवुन त्या सर्वांचे सहकार्याने सोडविण्यात येईल. पुर्वी महाराष्ट्रात विकासाचे दुष्टीने जालना शहराचा लातुर शहरानंतर क्रमांक येत असत. मात्र आज लातुर जिल्हा विकासाचे दृष्टीने फार पुढे गेला मात्र जालना जिल्हयाचा पाहिजे तितका विकास झाला नसुन विकास होणे आवश्यक आहे. याकरीता सर्व स्तरावर प्रयत्न करून जालना जिल्हयाचा जास्तीत जास्त विकास करणार तसेच जेपीसी बँकेस ज्यावेळी माझ्?या सहकार्याची आवश्यकता लागेल त्यावेळी निश्चित करणार असे सांगितले. यावेळी बँकेचे व्हा. चेअरमन संजय भरतीया, संचालक दिपक भुरेवाल, सतिश पंच, अ‍ॅड. अनिल संचेती, हितेंद्र शाह, किशोर देविदान, अभय करवा, अनुराग अग्रवाल, सुनिल बियाणी, सुनिल चौधरी, सुभाष वाघमारे महाव्यवस्थापक विजय जोशी, प्र. व्यवस्थापक विलास जाधव तसेच राष्ट्रवादीचे नेते बबलु चौधरी, जयप्रकाश चव्हाण, उद्योजक महेंद्र देशपांडे, विजय चौधरी, अनिल कुलकर्णी, मोरेश्वर दळवी, अशोक जोगड बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शेवटी बँकेचे महाव्यवस्थापक विजय जोशी यांनी आभार व्यक्त केले.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत बोगस लाभ घेणाऱ्यावर होणार कारवाई

जालना । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण पोर्टल वर जालना जिल्ह्यात मोठ्या संख्येने अर्जाची नोंदणी होत आहे. परंतु अर्जांची छाननी करतांना असे निदर्शनास येत आहे की, काही मोजक्याच लोकांकडून आधार कार्डवर जन्म तारीख बदलणे, शाळा सोडल्याचा दाखल्यामधील जन्म तारीखेत खाडाखोड करणे, रेशन कार्ड वर स्वत:च्या हाताने नाव टाकणे, इत्यादी बाबी निदर्शनास येत आहेत.तरी अशा विविध प्रकारे प्रशासनाची दिशाभूल करु नये. तसेच काही खाजगी कम्प्युटर सेंटर, कॅफे सेंटर, आपले सेवा सरकार केंद्र, सेतु सुविधा केंद्रावरुन अशा प्रकारे प्रशासनाची दिशाभूल करण्याचे प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितावर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले आहेत. नारी शक्ती दुत ॲपवरील ज्यांचे फॉर्म डिसअप्रुड झालेले आहेत त्यांनी ते फॉर्म त्रुटीची पुर्तता करुन नारी शक्ती दुत ॲपवर पुन्हा दाखल करावेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना पोर्टलवरुन प्रोव्हीझनली डिसअप्रुड झालेले अर्ज सुध्दा त्रुटीची पुर्तता करुन दाखल करावेत. जेणेकरुन त्यांच्या अर्जाची पडताळणी करुन पात्र लाभार्थ्यांना तातडीने लाभ देणे सोईचे होईल व कोणताही पात्र लाभार्थी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही. असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



बीडः उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते अमर नाईकवाडे, फारुख पटेल यांनी स्वागत केले. यावेळी खासदार सुनील तटकरे, कृषिमंत्री धनंजय मुंडे उपस्थित होते.

## सोयाबीनला ६ हजार रुपये भाव मिळण्यासाठी मुख्यमंत्री यांच्याकडे उदयसिंह बोराडे यांची मागणी

मंठा । प्रतिनिधी

सोयाबीन पिकाची आधारभूत किंमत ६०००रुपये सोयाबीन पिक हे राज्यातील मुख्य पीक असून महाराष्ट्र राज्यात सोयाबीन हे पीक शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा आणि उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे. दिवसेंनदिवस वाढत्या महागाईमुळे सोयाबीन पिकाचा उत्पादन खर्च सातत्याने वाढत आहे व त्या तुलनेने कमी दराने सोयाबीन पिकाची खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न घटत आहे. सन २०१३-१४ मध्ये सोयाबीनची आधारभुत किंमत ४६०० / रुपये प्रति क्विंटल होती आणि दहा वर्षानंतर २०२३-२०२४ मध्ये सोयाबीनची आधारभुत किंमत ४१००/ रु. प्रति क्विंटल झाली. तर डिझेल, खते, किटक नाशके आणि तृननाशकांच्या किंमतीत २५० % ने वाढ झाली असून औषधी, खते बियाने हे अनेक पटीने वाढली आहे परंतू सोयाबीन या पिकाचा भाव मात्र तोच राहीला आहे. सन २०२४-२५ या आर्थीक वर्षात राज्य सरकाराने सोयाबीन पिकाची आधारभुत किंमत ४८९५ प्रति क्विंटल निश्चीत केली आहे जी शेतकऱ्यांच्या खर्चानुसार खुपच कमी आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांची किंमतीही न मिळाल्यास आणि सरकार त्यांच्या पिकांची हमी भावापेक्षा कमी भावाने खरेदी करणार असेल तर राज्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडेल. तेंव्हा राज्यातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेवून सोयाबीन पिकाची हमीभाव ६०००/ रुपये प्रति क्विंटल पर्यत वाढवून सोयाबीन पिकाची खरेदी सर्वोच्च प्राधान्याने करण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमीत करावेत.

पान १वरून...

### पुन्हा संधी दिल्यास पुढील पाच

कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. व्यासपीठावर प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, आ.विक्रम काळे, प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर, ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, मा.आ.जनार्दन तुपे, जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.राजेश्वर चव्हाण, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर, जयसिंग सोळंके, प्रदेश उपाध्यक्ष पापा मोदी, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष प्रज्ञा खोसरे, मोहनराव ढाकणे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, रेखा फड, युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे, अल्पसंख्याक महिला जिल्हाध्यक्ष शाकेरा शेख, जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, सुभाष सपकाळ, लीगल सेल जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.नागेश तांबारे, डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, युवक जिल्हाध्यक्ष सुशांत पवार, विद्यार्थी शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, अजिंक्य आनेराव, सामाजिक न्याय सेलचे जिल्हाध्यक्ष आनंद सरपते, स्वयंरोजगार जिल्हाध्यक्ष विजय पोकळे, ग्रंथालय सेलचे जिल्हाध्यक्ष बालासाहेब फपाळ, युवक तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश, जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी उपस्थित होते. अजित पवार म्हणाले की, हे राज्य सामान्यांचं, गरिबांच आहे. आमच्या योजनांची किंमत गरिबांनाच कळेल. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन आलेल्यांना हे कळणार नाही. परळीत धनंजय मुंडे यांनी कृषी महोत्सव घेतला, तिथं आम्ही कांदा निर्यात बंदी करायची नाही असं सांगितलं. आम्ही बळीराजासाठी, त्याच्या घामाची किंमत मिळावी म्हणून उभे आहोत. महिला अत्याचाराला माफी नाही. दोषी कोणीही असो त्याला सोडणार नाही. आम्ही सत्तेला हपापलेले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास दैदीप्यमान आहे. त्यांच्या पुतळ्याच्या बाबतीत जे घडले ते दुर्दैवी आहे. त्या प्रकरणातील दोषींना धडा शिकवू असे ते म्हणाले. मी दहावा अर्थसंकल्प सादर करताना महिलांसाठी विशेष तरतूद करण्याचे ठरविले होते. त्यानुसार माझी लाडकी बहिण योजना राबविली. त्याचा महिलांना लाभ मिळतोय. परंतु विरोधकांकडून अपप्रचार केला जात आहे. परंतु बहिणींना कधी फसवणार नाही. ५२ लाख कुटुंबांना ३ गॅस सिलेंडर तुमच्या अकाऊंटला पैसे देणार आहे. थेट खात्यवरच पैसे जात आहेत. शिक्षण घेण्यासाठी मुलींना १०० फी देण्याचा निर्णय घेतला आहे, असेही त्यांनी म्हटले. शासनाच्या अनेक योजनांची तपशीलवार माहिती त्यांनी दिली. याप्रसंगी महायुतीतील घटक पक्ष शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांच्यासह पदाधिकार्यांनी श्री.पवार यांचा सत्कार केला. प्रास्ताविक डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचलन शिप्रा मानकर, प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार अ‍ॅड.प्रज्ञा खोसरे यांनी मानले. यावेळी महिला भगिनींची लक्षणीय उपस्थिती होती. दरम्यान, सभेनंतर ना.अजितदादांनी डॉ.योगेशभैय्यांच्या कार्यालयास भेट दिली. यावेळी महायुतीच्या काही पदाधिकार्यांचीही उपस्थिती होती.

**दुचाकी रॅलीने वेधले लक्ष; हॉटेलमध्ये केला दादांनी नाश्ता!**

ना.धनंजय मुंडे, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीडमध्ये हेलीपॅडवर आगमन होताच ना.अजित पवार यांच्यासमवेत नेत्यांचे स्वागत केले. शहरातून बाईक रॅली निघाली. या रॅलीत शेकडो तरूण-तरूणी सहभागी झाले होते. यावेळी फुलांची उधळण करण्यात आली. अजितदादांनी रस्त्यात व्यापारी बांधवांसह अल्पसंख्याक समाजाचे निवेदन स्विकारले. दौर्यात सुरक्षा व्यवस्था बाजूला ठेऊन प्रसिद्ध श्री हॉटेलमध्ये जाऊन नाश्ता केला. त्यांच्या या साधेपणाने उपस्थितांमधून कौतूक झाले.

----------

### कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून

अभ्यासपूर्ण असे भाषण केले, तसेच आ. पंकजाताई मुंडे यांनी भीमराव धोंडे यांच्या भाषणाचे कौतुक केले. कृषी प्रदर्शन भरवल्यामुळे त्यांचे आ. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन केले. शेतीच्या विकासासाठी शासनाने प्रत्येक मतदारसंघात कृषी प्रदर्शन भरवुन त्यास पाच लाख रुपये अनुदान द्यावे तरच शेतकऱ्यांना शेती विषयी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यासाठी मदत होईल. शेतकऱ्यांच्या विकासाचे मला वेड लागले आहे असे आयोजक माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत श्री. छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर, कृषी महाविद्यालय आष्टी यांच्या वतीने व शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसरे कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी आ. पंकजाताई मुंडे बोलत होत्या या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयोजक माजी आमदार भीमराव धोंडे हे होते पुढे बोलताना भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव व आ. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की ,राजकारणात काम करताना असे काम करा की कोणत्याही योजनेमुळे त्या माणसाची ओळख निर्माण झाली पाहिजे. बदलापूर घटने संदर्भात सांगितले की अशा अत्याचारी नीच माणसांना भर चौकात फाशी दिली पाहिजे.राजकारणात आता माणुसकी राहिलेली नाही. शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या जातात शासनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना हजारो रुपये दिले तरी देखील शेतकरी मतासाठी आर्थिक अपेक्षा करतात ही चिंताजनक बाब आहे. तालुका पातळीवर गटविकास अधिकारी हे महत्त्वाचे पद आहे. रोजगार हमीच्या माध्यमातून केलेले रस्ते कुठे गेले असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छता अभियान राबवले त्याची देखील व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही. सर्वांगीण विकासासाठी आदर्श गावकरी व आदर्श सरपंच असावा शासनाच्या विविध योजना राबवण्यासाठी लोकांनी सहकार्य करण्याची गरज आहे. माजी आ.भीमराव धोंडे हे स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांचे सहकारी मित्र होते. आमचे पहिल्यापासून पारिवारिक संबंध आहेत. भिमराव धोंडे हे अत्यंत शांत, संयमी नेतृत्व असून कोणालाही त्रास देण्याचे काम त्यांनी केले नाही. माझ्याकडे शिस्त आहे मला बेशिस्तपणा अजिबात आवडत नाही. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार भीमराव धोंडे हे होते, परंतु त्यांनी आमदार पंकजाताई मुंडे यांच्या अगोदर भाषण केले या भाषणाचा धागा पकडून आ . पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, मा. आ. भीमराव धोंडे हे खरोखरच शेतकरी आहेत ते आमदार असताना त्यांनी विधानसभेत सर्व आमदारांना ड्रॅगन फ्रुट खाण्यासाठी आणले होते. शेती करताना शेतकऱ्यांनी पाण्याचे व्यवस्थित नियोजन करून मातीचा पोत व मूलद्रव्य कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करावा. राजकारण म्हणजे येड्या गबाळ्याचे काम राहिले नाही. मुंडे साहेब हे लोकनेते होण्यासाठी त्यांनी सर्वसामान्यांशी नाळ जोडली होती. यावेळी कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष व भारतीय जनता पक्षाचे युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजय दादा धोंडे व अभय राजे धोंडे यांनी उपस्थित पाहुण्याचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, राज्यात अनेक कृषी प्रदर्शने होतात आपण मात्र शेतकऱ्यांसाठी अत्यंत कष्ट केलेले व तामिळनाडू राज्यात जन्मलेले डॉ. स्वामीनाथन यांचे नाव दिले आहे. डॉ. स्वामीनाथन यांनी भूदान चळवळीत आपली शेकडो एकर जमीन दान केली होती. पूर्वी शेतीचे उत्पन्न कमी होते आता मात्र उत्पादन वाढत चालले आहे. दिवसेंदिवस देशाची व जगाची लोकसंख्या वाढत आहे भविष्यात अन्नधान्य व इतर अत्यावश्यक गोष्टीची टंचाई निर्माण होऊ शकते यावर उपाय करण्यासाठी केंद्र शासनाने आत्तापासूनच देश पातळीवर तज्ज्ञांची समिती स्थापन करून त्यावर अभ्यास करणे गरजेचे आहे. देशाचे संरक्षण खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची मुले म्हणजेच शेतकरीच करत आहेत . शेतकऱ्याशिवाय देशाची कोणतीच गोष्ट घडत नाही. शेतकऱ्यामुळेच देश चांगला घडत आहे. शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी शासनाने हमीभाव वाढवला पाहिजे. शेतकरी संघटना ते शेतकरी शिक्षण संस्था असा माझा प्रवास झाला आहे. शेतकऱ्यांसाठी मी दिल्ली, बीड ,मुंबई तसेच मतदारसंघात पायी मोर्चे काढले. पद्मश्री पोपटराव पवार हे माझे लहान भाऊ आहेत आज त्यांनी आपले व गावाचे देशात नावलौकिक केले आहे. याप्रसंगी बोलताना जिल्हा परिषदचे माजी सदस्य रामराव खेडकर व सुधीर घुमरे यांनी सांगितले की मा आ भीमराव धोंडे यांनी स्व. गोपिनाथराव मुंडे यांना वेळोवेळी मोलाची साथ दिली. राजकारणात मनापासुन त्यांना सहकार्य करण्याचे काम केले. भिमराव धोंडे यांनी आयोजित केलेल्या कृषी प्रदर्शनामुळे मतदारसंघातील शेतकऱ्यांना शेतीविषयी चांगले ज्ञान मिळण्यासाठी फायदा होत आहे. जि. प. चे माजी अध्यक्ष विजय गोल्हार यांनी सागितले की, कृषी प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांना नवनविन तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यासाठी मदत होईल. यावेळी ज्येष्ठ पत्रकार व प्रा. अनंत हंबर्डे यांनी सांगितले की, माजी आमदार भीमराव धोंडे यांनी शेतकऱ्यांसाठी दिल्लीपर्यंत पायी मोर्चा काढला ते खरोखर शेतकऱ्यांचे प्राण आहेत. यावेळी परभणी कृषी विद्यापीठाचे डॉ. भगवान आसेकर, बबनराव झांबरे व इतरांची भाषणे झाली. यावेळी शासनाचा कृषी पुरस्कार प्राप्त बाबासाहेब पिसोरे,सौ . दमयंतीताई धोंडे, सौ.अक्षदा अजय धोंडे, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस युवा नेते अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे,माजी कृषी आयुक्त सुनिल चव्हाण, चेअरमन राजेश धोंडे, ,गो. गो. मिसाळ, किशोर खोले,माजी सभापती सुवर्णाताई लांबरुड, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस शंकरराव देशमुख,रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, जेष्ठ नेते विठ्ठलराव बनसोडे, हरिभाऊ जंजिरे, आदिनाथ सानप, बाजीराव वाल्हेकर, माजी सभापती अनिल जायभाय, बाळासाहेब वाघुले, पं. स. सदस्य रावसाहेब लोखंडे, उपसभापती नामदेव धोंडे,माजी सभापती नियामत बेग, पांडुरंग गावडे, दिनकर तांदळे महाराज, दिलीपराव काळे, संजय कांकरिया, माजी सरपंच सुदाम झिंजुर्के, जयंत राख, रामदास बडे, लालाभाऊ कुमकर, मधुकर गर्जे, अंकुश मुंढे, कुंडलिक आस्वर, बाळासाहेब भुकन, सोपानराव गाडे, बाबासाहेब ससाणे,दिलीपदादा हंबर्डे,गौतम ससाणे बाबुराव कदम, रघुनाथ शिंदे, आप्पासाहेब राख,नवनाथ गाडे, अ‍ॅड. खेडकर, बाबासाहेब जाधव, गटविकास अधिकारी सचिन सानप,कृषी अधिकारी प्रमोद कोकरे नाथाभाऊ शिंदे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, हनुमंत थोरवे, कृषी अधिकारी गोरख तरटे, माऊली पानसंबळ, सरपंच माऊली वाघ, शैलजा गर्जे, विष्णूपंत वायभासे, माजी सरपंच संतोष चव्हाण, संभाजी झांबरे, कल्याण पोकळे, रत्नदिप निकाळजे, संदीप नागरगोजे, सरपंच अभय गर्जे, अज्जुभाई व इतर मान्यवर कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य श्रीराम आरसुळ यांनी गतवर्षीच्या कृषी प्रदर्शनाच्या बाबत माहिती दिली तसेच यावर्षी जवळपास ११५ स्टॉल सहभागी झाल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश दिवटे यांनी केले.भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस शंकरराव देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

----------

### महाराजांच्या पुतळाप्रकरणी

२०२३ रोजी पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. या प्रकल्पाची संकल्पना भारतीय नौदलाने तयार केली होती आणि राज्य सरकारच्या समन्वयाने त्यासाठी निधीही उपलब्ध करून दिला होता. आता शिवरायांचा पुतळा लवकर पुनर्स्थापित करण्यासाठी सर्व उपायांमध्ये मदत करण्यासाठी भारतीय नौदल कटीबद्ध आहे, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

---------

### बीड जि. प. सीईओ म्हणून

आयुक्त विकास, रोजगार व उद्योजकता, नवी मुंबई या पदावर बदली करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर या बदल्या केल्या असल्याचे म्हटले जात आहे.

---------------

### राहुल गांधी पुन्हा भारत

त्यांच्या फिटनेसच्या चर्चा झाल्या. याशिवाय या व्हिडिओच्या माध्यमातून राजकीय संदेश देण्याचे कामही राहुल गांधींनी केले. भारत जोडो यात्रा लवकरच काढणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. म्हणजेच राहुल गांधीच्या भारत जोडो यात्रेचा तिसरा भाग लवकरच सुरू होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राहुल गांधींची ही भारत जोडो यात्रा सुरू होणार आहे.

------

### उद्यापासून पावसाचा जोर

अकोला, अमरावती, नागपूर, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदीया आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट हवामान विभागाने दिला. तर मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे, मध्य महाराष्ट्र आणि कोकणातही काही ठिकाणी पावासचा जोर वाढेल, असा अंदाज हवामान विभागाने दिला. रविवारी आणि सोमवारीही राज्यातील अनेक भागात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. रविवारी विदर्भ, मराठवाड्यातील काही भागात आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागात जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. तर सोमवारी राज्यभरात ठिकठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

-------------

### तुम्ही बाळासाहेब आजबे

वतीने सुरू असलेली जनसन्मान यात्रा गुरुवार दिनांक २९ ऑगस्ट रोजी दुपारी ०१ वाजता आष्टी येथे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष सुनीलजी तटकरे महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय जी मुंडे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आष्टी मध्ये दाखल झाली. यावेळी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या वतीने जोरदार स्वागत करत भव्य अशा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते .यामध्ये युवक महिला व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोरेश्वर लॉन्स येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार म्हणाले की आम्ही सरकारमध्ये आहोत सामान्य जनतेसाठी सकाळी सात ते संध्याकाळी सात पर्यंत काम करतो. सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन पुढे आपल्याला जायचं आहे आपण सर्वांमुळे वेगवेगळी पदे मी भूषवली आहेत तर आज आज उपमुख्यमंत्री आहे त्यामुळे आपल्या हातून चांगले काम कसे करता येईल यासाठी मी नेहमी प्रयत्नशील असतो. बीडला कृषिमंत्री पद दिले आहे तुमचे कृषिमंत्री ही होतकरू आहेत त्यांचाही शेतीचा मोठा अभ्यास आहे वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून त्याचा फायदा शेतकऱ्यांनी घ्यावा एक रुपयात पिक विमा भरण्याची योजना राज्य सरकारने आणली त्यामध्ये एक कोटी ७० लाख रुपयांचा विमा भरला आहे सरकार तुमचे आहे आम्ही पण सर्व शेतकरी आहोत आम्हालाही शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण आहे मी आजपर्यंत अनेक पदे उपभोगली आज मी तुमच्यामुळेच उपमुख्यमंत्री या पदावर आहे पदाचा वापर जर लोकांच्या कल्याणासाठी करता येत नसेल तर त्याचा उपयोग नाही आमच्या हातून लोक कल्याणकारी कामे व्हावीत हाच नेहमी आमचा प्रयत्न असतो महाराष्ट्रातील ५० लाख महिला या लखपतीदिदी करण्याचा संकल्प आम्ही केला आहे हे सरकार काम करणारे सरकार आहे कोरोना काळातही लोकांना मदत केली आहे जनतेच्या आशीर्वामुळे आष्टी पटोदा शिरूर मतदार संघात आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या माध्यमातून २२५० कोटी रुपयांचा निधी विकास कामासाठी आजपर्यंत आम्ही दिला आहे आमदार बाळासाहेब आजबे हे चिकाटीचे व आक्रमक आमदार आहेत काम करून घेण्याची जिद्द त्यांच्यामध्ये आहे त्यामुळे आज मोठ्या प्रमाणात विकास निधी मतदारसंघासाठी त्यांनी खेचून आणला आहे यापुढेही तुम्ही आमदार बाळासाहेब आजबे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा बाकी सगळे माझ्यावर सोडा विरोधकांकडून अफवा पसरल्या जातील याची तिकीट कापले त्याचे तिकीट कापले हा उमेदवार आहे तो उमेदवार आहे असे काही होणार नाही मी आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे त्यामुळे तुम्ही कसलीही काळजी करू नका अशा स्पष्ट शब्दांमध्ये आमदार बाळासाहेब आजबे यांना अजित दादा पवार यांनी एक प्रकारे विधानसभेच्या उमेदवारीचे संकेत दिले. यावेळी राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे बोलताना म्हणाले की महाराष्ट्र सरकारच्या वतीने राज्यांमध्ये वेगवेगळ्या योजना राबवल्या जातात त्यामुळे येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पुन्हा महायुतीचे सरकार येणार आहे कृषी विभागाच्या वतीने अनेक योजना सुरू आहेत त्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा जिथे अडचन येईल तेथे त्वरित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या व आमदार बाळासाहेब आजबे यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा आम्ही शेतकरी व सर्वसामान्य जनतेसाठी कधीही कमी पडणार नाहीत, असे सांगितले. यावेळी बोलताना आमदार बाळासाहेब आजबे यांनी मतदारसंघातील बंधारे तलाव विजेचा प्रश्न यासारख्या शेतकऱ्यांशी निगडित समस्या उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर मांडल्या तर येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणात मतदारसंघांमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार कृषी मंत्रीतथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विकास कामे करणार असल्याचे सांगितले या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे रूपालीताई चाकणकर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण प्रदेश युवक अध्यक्ष सुरज चव्हाण माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉक्टर शिवाजी राऊत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आष्टी तालुका अध्यक्ष काकासाहेब शिंदे शिरूर तालुका अध्यक्ष विश्वास नागरगोजे दीपक दादा घुमरे पाटोदा तालुका अध्यक्ष सतीश आबा शिंदे विठ्ठल सानप दशरथ दादा वनवे धैरशील थोरवे भाऊसाहेब लटपटे युवराज झुंनगुरे महेश आजबे संग्राम आजबे यश भैया आजबे माजी सभापती जयाताई गुंड यांच्यासह मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी गट गण प्रमुख व कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महिलांनी गर्दी केली होती कार्यक्रमांमध्ये सर्व महिलांनी गुलाबी फेटे बांधल्यामुळे एक प्रकारे गुलाबी वादळ या ठिकाणी असल्याचे पहावयास मिळाले मोठ्या संख्येने महिला शेतकरी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित राहिले.

----------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.३० ऑगस्ट २०२४



## स्वत:चे भविष्य घडविण्यासाठी शिक्षण घ्या : न्यायमूर्ती प्रशांत कुलकर्णी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शिक्षण हे अतिशय पवित्र आहे. इथे विद्यार्थी विद्या ग्रहण करतात. तुम्ही जेवढे ज्ञान घ्याल ते कमीच असते .विद्यार्थ्यांनी शिक्षकांकडून अधिकाधिक ज्ञान व चांगले गुण घेतले पाहिजेत व स्वतःचे भविष्य बदलण्यासाठी आणि घडवण्यासाठी ज्ञान घेतले पाहिजे असे प्रतिपादन न्यायमूर्ती प्रशांत कुलकर्णी यांनी केले. ते येथील खोलेश्वर महाविद्यालयातील कनिष्ठ विभागातील स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बिभीषण फड,, आधार माणुसकीचा या सेवाभावी संस्थेचे संचालक एडवोकेट संतोष पवार, कनिष्ठ महाविद्यालयचे उपप्राचार्य डॉ. दिगंबर मुडेगावकर पर्यवेक्षक आनंद पाठक यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, आकलन व ग्रहण केल्याने तुमच्या व्यक्तित्त्वात व अस्तित्वात फरक पडत असतो. आत्मा, शरीर, मन व बुद्धी यांचा समन्वय होतो तेव्हाच शिक्षण प्रक्रिया होत असते. प्रत्येक विद्यार्थी हा वेगळा असतो. प्रत्येकात एक स्पार्क असतो हा स्पार्क ओळखून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिशा दिली तर त्यांच्या आयुष्याला कलटणी मिळून ते यशस्वी होतील. ज्ञान हे फक्त पैसे मिळवण्यासाठीच आहे असे अजिबात समजू नका, पैसा हे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय कधीच असू शकत नाही त्यामुळे नैतिकता, नात्यांची जपणूक, गुरूप्रति आदर इत्यादी मूल्यांची जपणूक करा असे प्रतिपादन करून त्यांनी विद्यार्थ्यांना न्यायिक क्षेत्रातील विविध स्पर्धा- परीक्षांविषयी माहिती देऊन मार्गदर्शन केले.

# जुनी पेंशन लागू करा ; परळी नगर परिषदचे अधिकारी कर्मचारी बेमुदत संपावर

## नगर परिषद सर्व विभागातील कामकाज ठप्प, नागरिकांची गैरसौय

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**जुनी पेशन योजना व इतर विविध मागण्यासाठी नगर परिषद /नगर पंचायत कर्मचारी यांनी राज्यव्यापी संप पुकारला आहे. यासंपामध्ये परळी वैजनाथ येथील नगर परिषद कार्यालयातील सर्व कर्मचारी सहभागी झाले आहेत. तसेच घोषणा देऊन शासनाचे निषेध व्यक्त केला जात आहे. जो पर्यंत आमच्या मागण्यापूर्ण होत नाही तोपर्यंत हा बेमुदत संप सुरु राहणार असल्याची प्रतिक्रिया संप कर्त्यांनी दिली आहे. संपावर कर्मचारी गेल्यामुळे नगर परिषद सर्व विभागातील कामकाज ठप्प होऊन नागरिकांची गैरसौय झाली होती.**

राज्यातील सर्व नगर परिषद नागरिकांच्या मूलभूत समस्यांचे निवारण करण्याचे शासनाचे महत्त्वपूर्ण कार्य ज्या नगरपरिषद कर्मचाऱ्यांमार्फत होते. त्या कर्मचाऱ्यांना अद्याप पर्यंत २००५ साली लागू झालेली पेन्शन योजना आणि २०१५ साली लागू झालेली पेन्शन योजना प्रत्यक्षात लागू झालेली नाही. शासनाचे विविध विभाग नगरपरिषद कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारीच मानायला तयार नाही ही अत्यंत खेदाची बाब असून या विरोधात महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेने २९ ऑगस्ट २०२४ पासून बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. नगरपरिषद/ नगरपंचायतीमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या समस्या व मागण्या पुढीलप्रमाणे जुनी पेंशन योजना लागू करणे किंवा नविन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंमलबजावणी करणे., राज्य संवर्ग पदे सातवा वेतन आयोग अधिसूचनेत पदांचा समावेश करुन सेवार्थ नंबर मिळणे., सहायक अनुदान एक महिना आगाऊ देणे, सातव्या वेतन आयोग फरक व मागील महागाई फरक रक्कम मिळणे, नगरपरिषद कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना १०, २०,३० लागू करणे, राज्य संवर्ग सर्वसाधारण बदल्यांमधील जाचक अटी वगळणे,



पदोन्नतीतील कोट्यातील रिक्त पद तात्काळ भरणे, मुख्याधिकारी विभागीय स्पर्धा परिक्षा तात्काळ मार्फत घेणे, सेवानिवृत्ती उपदान व रजा रोखीकरण शासनाकडे भरणे व स्थानिक कर्मचारी निवृत्ती रक्कमांचे अनुदान मिळणे, धारणाधिकार सह नियुक्ती व बदली पदस्थापना करणे, नियोजित शासकीय संघटना प्रस्तावानुसार संघटनेची नोंदणी करण्यात यावी. तसेच नगरपरिषद/ नगरपंचायतीमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या मागण्या, वेतन शासन लेखा कोषागार मार्फत करण्यात यावे. संवर्ग सेवेतील श्रेणी-अ. पदास गट-ब (राजपत्रित) दर्जा आणि श्रेणी-ब पदास गट-ब (अराजपत्रित) दर्जा मिळणे, सहायक आयुक्त/मुख्याधिकारी गट-ब (राजपत्रित) पदावर ६०% जागा राज्य संवर्ग पदोन्नतीने भरण्यात याव्यात., कर व प्रशासकीय, अग्निशामक आणि स्वच्छता निरीक्षक सेवा संवर्ग वेतनश्रेणी ४२००/एस-१३ करावी., अभियांत्रिकी संवर्गातील अभियंता यांना इतर विभाग प्रमाणे पदनाम व वेतनश्रेणी लागु करावी. अ वर्ग नगरपरिषद पदावर संवर्ग सेवेतील लेखा अधिकारी नियुक्ती करावी., पाणीपुरवठा, मलनिस्सारण व स्वच्छता संबर्ग यांची वाढीव पदे निर्माण करावी. संगणक, अग्निशमन व विद्युत या संवर्गाची पदे नगरपंचायतींमध्ये निर्माण करावी., क वर्ग नगरपरिषदांना उपमुख्याधिकारी हे पद निर्माण करावे, राज्य संवर्ग श्रेणी-क पदांवर २५% जागा नगरपरिषद कर्मचारी यांची स्वतंत्र परिक्षा किंवा सेवा ज्येष्ठताने भरावी. संवर्ग अधिकाऱ्यांचे विविध प्रश्न मांडले. जुनी पेन्शन योजना व संवर्गाचे मूलभूत समस्या/मागण्यावर शासन स्तरावर मोठे दुर्लक्ष झाले असल्याने २९ ऑगस्टपासून सर्व संघटनासह संपात सहभागी होण्याचा निर्णय एकमताने यावेळी घेण्यात आला. सदरच्या मूलभूत समस्या व मागण्यांवर विनंती करण्यात येते की, समस्या व मागण्यांवर तात्काळ कार्यवाही व्हावी. ही नम्र विनंती. या संपात परळी वैजनाथ नगर परिषद कार्यालयीत सर्व कर्मचारी सहभागी झाले आहेत. यामुळे नगर परिषद विभागातील सर्व कामकाज ठप होते. यांमुळे नागरिकांची गैरसोय झाली होती. यावेळी नगर परिषद कार्यालयातील उपमुख्यधिकारी संतोष रोडे, शंकर साळवे, अजय कलंत्री व इतर कर्मचारी उपस्थितीत होते.

## महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने रानबा गायकवाड यांचा सत्कार

**परळी । प्रतिनिधी**



महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल जेष्ठ पत्रकार व साहित्यिक पत्रकार तथा दिग्दर्शक रानबा गायकवाड यांचा महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटनेच्या वतीने आज दिनांक २९ ऑगस्ट रोजी सत्कार करण्यात आला.

परळी पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी तालुक्याचे अध्यक्ष ए. तु.कराड होते. तर प्रमुख अतिथी म्हणून बीड जिल्ह्या अध्यक्ष बाबुराव नागरगोजे, राज्य कार्याध्यक्ष शिवाजीराव धायजे, संघटनेची विभागीय अध्यक्ष जी.आर.घाटुळ, संघटनेचे जिल्हा कोषाध्यक्ष डाके आदी उपस्थित होते. पंचायत समिती सभागृहात झालेले या कार्यक्रमात स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सर्व अतिथींचे स्वागत झाल्यानंतर महाकवी वामनदादा कर्डक पुरस्कार मिळाल्याबद्दल परळी येथील पत्रकार तथा लेखक दिग्दर्शक, व कवी रानबा गायकवाड यांचा भव्य असा सत्कार करण्यात आला. या सत्कार ला उत्तर देताना रानबा गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी असे सांगितले की, '' ज्योतिराव फुले यांच्या अखंड काव्यातून सुरुवात होते, ती ती वामनदादा कर्डक यांच्या काव्यापर्यंत पोहोचते, ती काव्यधारा म्हणजे मानवतेची काव्यधारा होय. त्यांनी त्यांच्या काव्यामध्ये समाज मन टिपलेले आहे. शोषितांचा इतिहास त्यांच्या काव्यात लिहिलेला आहे. याप्रसंगी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अखिल सर यांनी केले. तर आभार दिलीप कुलकर्णी सर यांनी मानले.



## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना समितीचे अध्यक्ष अमर नाईकवाडे आणि त्यांची टिम महिलांना मदत करण्यासाठी तहसील कार्यालयाच्या आवारात तंबू टाकून मदतीसाठी सज्ज आहे. बीड विधानसभा मतदारसंघातील सर्व महिलांच्या मदतीसाठी सात ते आठ सदस्य कार्यालयीन वेळेत याठिकाणी उपस्थित असतात. या योजनेसंदर्भात कुठल्याही तक्रारी असल्यास त्याचे निवारण करण्याचे काम तसेच ऑफलाईन अर्ज स्विकारण्याचे काम ही समिती करत असून या समितीद्वारे ते अर्ज ऑनलाईन केले जातात.

## साळिंबा येथे अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप

**वडवणी । प्रतिनिधी**



साळींबा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त काल गुरुवार रोजी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप व वृक्षारोपण करण्यात आले.

साळींबा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून साजरी करण्यात आली तसेच यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच शाळेच्या परिसरात वृक्षारोपण ही करण्यात आले यावेळी उपस्थित युवा नेते संजय भाऊ आंधळे, अँड तथा पत्रकार विनायक जाधव, मानवी हक्क अभियान वडवणी तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले, अँड.भास्कर उजगरे यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी या कार्यक्रमाला सरपंच दिनेश नाईकवाडे, उपसरपंच शामराव जाधव, अंबादास जाधव, शंकरराव जाधव,मदन बोंद्रे,गणेश मोटे, सतिष खाडे, बबनराव जाधव,उत्तरेश्वर जाधव, जिल्हा परिषद शाळेचे कैलास दुधाने सर, धावडे सर, सांगळे,अनिस शेख यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन जयंती उत्सव समितीचे मसुराम जाधव, मनोहर जाधव, मुकेश आवाड,महादेव जाधव, शहादेव जाधव , मिलिंद जाधव यासह इतरांनी केले होते.

पान ६ वरून...

### आष्टी मतदारसंघात प्रस्थापित

उद्योगधंदे आलेले नाहीत पाटोदा शहरांमध्ये गेल्या ३५ वर्षांपूर्वी एम.आय.डी.सी. साठी जागा उपलब्ध करून दिलेली आहे. परंतु सदरील जागा काही विशिष्ट व्यक्तीने हडप केल्याची समजते व सामान्य छोट्या छोट्या उद्योगाला त्या ठिकाणी उद्योग टाकण्यासाठी जागाच उपलब्ध नाही. त्याबाबत आतापर्यंतच्या आमदारांनी कुठलेही प्रयत्न केलेले दिसत नाहीत तसेच आष्टी मतदार संघात कडा महेश सहकारी साखर कारखाना हा बंद पडलेला असून कामगाराचे करोडो रुपयाची थकबाकी त्या ठिकाणी देणे बाकी आहे. माननीय उच्च न्यायालयाने सदरील कामगाराच्या रकमा कारखान्याची जमीन विक्री करून देण्याचे आदेश केलेले आहेत. आज पाटोदा शहरामध्ये फिल्टरचे सोडा. साधे पाणी देखील लोकांना पिण्यासाठी मिळत नाही करोडो रुपये निधी पाटोदा नगरपंचायत मध्ये आला परंतु पाटोदा शहरांमध्ये एकही रस्ता धड नाही, ड्रेनेज नाही, गावांमध्ये स्वच्छता नाही नगरपंचायत मांजरा नदीवर पुलकम बंधारा तयार केला त्यामध्ये भ्रष्टाचार होऊन आरोपीवर गुन्हा दाखल झालेला आहे. काम अर्धवट अवस्थेत पडलेले आहे नुकताच मांजरा नदीवर झालेला पूल देखील पहिल्याच पावसात वाहून गेलेला आहे. पाटोदा नगरपंचायतचे अनेक भ्रष्टाचाराचे प्रकरणे उच्च न्यायालयमध्ये मी जनहित याचिकेच्या माध्यमातुन लढवलेले असल्याचे ॲड. जाधव यांनी सांगितले.

### अंबाजोगाईत निघाला

अंबाजोगाईते सकाळ हिंदू समाजाच्या वतीने जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यंसह व्यपारी, सामान्य नागरिक, सामाजिक कार्यकर्ते या मोर्चात सहभागी झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून सुरु होऊन हा मोर्चा उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. बांग्लादेशसह संपूर्ण भारतात विशिष्ट समुहाकडून हिंदु माता भगिनीवर होणाऱ्या बलात्काराच्या घटना / अमानुष हत्या, मंदिराची तोड फोड व विटंबना तसेच देशात चालु असलेल्या लव्ह जिहाद, गोहत्या, साधु संतांवरील अत्याचार, जमीन जिहाद तसेच शिवछत्रपतीच्या गडकिल्ल्यावर होणारे अतिक्रमण, कोलकत्ता येथील महिला डॉक्टरवरील अमानुषपणे झालेला अत्याचार, तसेच बदलापुर येथे झालेला बालवयीन मुलीवर झालेले अत्याचार, व उरण येथील यशश्री शिंदे हीची जिहादी मानसिकतेने केलेले बलत्कार व हत्या, धारावी येथील अरविंद वैद्य यांची अमानुष हत्या, मालवण येथील शिवछत्रपतीचं स्मारक ज्या ठेकेदारानी बोगस काम करून बनवले त्या पीडब्युडी अभियंता सहित चौकशी लावावी व योग्य ती कारवाई करावी. तसेच, बांगलादेशमधील हिंदु बांधव यांना सुरक्षा द्यावी व त्यांना मायदेशीत स्विकारावे व त्यांचे पुनर्वसन करावे व भारतात राहणारे सर्व बांगलादेशी रोहिग्या यांना पोलीस यंत्रनाने शोध घेऊन त्यांना देशाबाहेर हाकलुन द्यावे आदी मागण्यांचे निवेदन शासनाला देण्यात आले. या सर्व मागण्यांना राज्य व केंद्र शासनाने गंभीरतेने घ्यावे अन्यथा जनतेच्या आक्रोशाला याहूनही मोठ्या स्वरूपात सामोरे जावे लागेल असा इशारा अंबाजोगाई येथील सकल हिंदु समाजाच्या वतीने देण्यात आला. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने आणि शांतेत हा मोर्चा पार पडला. मोर्चाच्या पार्श्वभूमीवरहरत तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### ''येता संकट बालकावरी

अडचणीत, संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्व बालकांसाठी चाईल्ड हेल्प लाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित आहे.सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकाना २४७ हेल्पलाईन सेवा उपलब्ध आहे. सदर सेवेचा लाभ बालक स्वतः घेवू शकतो किंवा इतर कोणीही सदर सेवेद्वारे बालकाला मदत मिळवून देऊ शकतात. १०९८ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून संकटग्रस्त बालकांना मदत करावी असे आवाहन महिला व बाल विकास विभागाकडून करण्यात आले आहे,

पान ६ वरून...

### हनुमान वस्तीवरील

संपर्क साधला आसता तरप्रकरणी मंडळ तहसिल कार्यालयाला अहवाल सादर केल्याची ते खोटी माहीती देत आहेत.

मंडळ अधिकारी बदलण्याची मागणी...

उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांनी सांगुनही मंडळ अधिकारी सुहास डोरले हे राजकीय दबावापोटी अतिक्रमणाला विरोध करणा-या शेतक-यांशी संगणमत करुन त्यांना अभय देऊन वरीष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता कर्तव्यात कसुर करीत आहेत . अधिका-यांची दिशाभुल करीत आहेत,त्यामुळे या प्रकरणी त्यांच्या ऐवजी दुस-या मंडळ अधिका-याची नियुक्ती करुन रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात यावे किंवा तत्कालीन तहसिलदार यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे नदीच्या बाजुने रस्ता उपलब्ध करुन देण्याची मागणी उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांचेकडे हनुमान वस्ती येथील शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### आम्ही चळवळीचे वारसदार

भाऊ साळवे,मा, भगवान भाई राठोड सरपंच बाबा सर एडवोकेट सय्यद दादासाहेब सोळंके जी एन घनगाव कृष्णा बाप्पा घनगाव ही सर्व प्रमुख पाहुणे उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाचे आयोजन आ यो ज क - शंकर आलाट ,बालाजी,उमाजीं आलाट व हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा, रमेश आलाट, केशव आलाट , धर्मराज आलाट , पांडुरंग आलाट अशोक पोळ महादेव पोळ सर्जेराव फंदे केशव आलाट ,लक्ष्मण आल्हाट राजू आलाट अनिल आल्हाट , महादेव आलाट काशिनाथ आलाट, नितीन आलाट, विशाल अशोक आलाट, वसंत आलाट, नागनाथ आल्हाट , मोतीराम आलाट सतीश आल्हाट भीमराव शाहीर आलाट यांनी परिश्रम घेतले ..!!

### खेळ हा विद्यार्थी जीवनात नेतृत्व

संस्थापक अध्यक्ष कै. श्यामरावजी देशमुख यांच्या प्रतिमांच्या पूजनानंतर क्रीडा विभाग प्रमुख डॉ.दिग्रसकर यांनी प्रास्तविक केले .त्यात त्यांनी क्रीडादिनाचे महत्त्व सांगून खेळाची जीवनातील यथार्थता प्रतिपादन केली. या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनपर वक्तव्यात प्रा . प्रसादजी देशमुख यांनी '' क्रीडा क्षेत्र हे जीवनाला आमूलाग्र परिवर्तन करणारे क्षेत्र आहे . त्यामुळे खेळाडूचा मानसिक बौद्धिक - भावनिक विकास होऊन नेतृत्व व संघभावनाही वाढते असे सांगून करिअर म्हणूनही हे क्षेत्र महत्वाचे आहे '' असे प्रतिपादन केले.अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. व्ही.व्ही.देशपांडे यांनी जीवनात खेळाचे विविध प्रकारचे महत्त्व सांगून प्रत्येक विद्यार्थिनींनी खेळ हा जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा असे सांगितले. तसेच या वर्षी डॉ . बा . आं . मराठवाडा विद्यापीठाच्या यावर्षीच्या नियोजन समितीचे अध्यक्षपद व सचिवपद हे आपल्या महाविद्यालयाला मिळाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ विनोद जगतकर यांनी अप्रतिम सूत्रसंचालन केले.तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रकटन क्रीडा विभाग प्रमुख डॉ प्रवीण दिग्रसकर यांनी केले.सोहळ्यात महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी वर्गाचा प्रचंड सहभाग लाभला.

## ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने उपमुख्यमंत्री पवार यांना विविध मुद्द्यांवर निवेदन दिले- नितीन सोनवणे

बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कल्याण बीड, महात्मा फुले अंतर्गत - ६४१ दाखल केलेल्या फाईलचा निधी लाभार्थ्यांना तात्काळ देण्यात यावा. व १६२ कोटी अनुसूचित जातीचा वळवळेला निधी वापस देण्यात यावा.

विशाल गड दंगलीतील दंगलखोरांना अटक झाली पाहिजे. नुकसान झालेल्या ग्रामसथांना त्यांची नुकसान भरपाई तात्काळ द्यावी. आरोपींना ॲक्ट अंतर्गत कायदेशीर कारवाई करावी.

दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत जिल्हा व तालुक्यातील भूमीहीनांना दलितांना तात्काळ जमीन द्यावी.

आजच्या तारखेपर्यंत ताब्यात असलेल्या गायरान जमिनीचे तात्काळ सातबारा देण्यात यावेत.

फिलोशिप स्वाधार घरकुल योजनेचा सामाजिक न्यायचा निधी इतरत्र वळवू नये फिलोशिप सरसकट द्यावी.

बीड येथील श्रेयस सोलार



श्रेयस कंट्रक्शन जीएस एजन्सी श्री पंडित मोहन जगताप आणि तात्यासाहेब मोहन जगताप यांनी शासनाच्या विविध योजनेमध्ये बोगस कामे करून कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केल्याने सण २०१८ जानेवारी ते मार्च २०२४ पर्यंत केलेल्या सर्व कामाची हेड निहाय चौकशीचे आदेश द्यावेत व दोशींवर योग्य ती कारवाई करावी, पाणंद रस्त्याच्या नावाखाली बीड जिल्ह्यामध्ये बोगस बिले उचलण्याचे चौकशी करण्याचे आदेश द्यावेत व दोषींवर योग्य कारवाई करावी उचललेला शासनाचा निधी सातबारावर बोजा टाकून वसूल करावा.

तुझ्यावर रेप झाला का असे म्हणून दलित पत्रकार मोहिनी जाधव हिचा विनयभंग जातीवाद करणारा आरोपी वामन म्हात्रे शिवसेना शिंदे गटाचा शहराध्यक्ष असून त्याच्यावर विनयभंग ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल झाला असून त्यावर कठोर शासन करावे.

२१/०८/२०२४ रोजी ज्या एस सी एसटी आरक्षण वर्गीकरण निर्णयाच्या संदर्भात महाराष्ट्रभर आंदोलन कर्त्यांवरील दाखल केलेले गुन्हे तात्काळ मागे घ्या.शासकीय वसतिगृहात खाजगी कंत्राटदारा मार्फत सुरक्षा कर्मचारी देण्याचा जीआर रद्द करा.पोलिसांना अवमान करणाऱ्या त्यांच्या आत्मसन्मानाला ठेच पोचणाऱ्या आमदार निलेश राणीला अटक करा.स्वामी विवेकानंद आश्रम शाळा लातूर याची मान्यता रद्द करा व मयत अरविंद खोपे वय १३ वर्ष या विद्यार्थ्यास मारणाऱ्या शिक्षकाला फाशीची शिक्षा द्या.बीड जिल्ह्यातील कोचिंग क्लासेस वस्तीग्रह व जिल्हा परिषद शाळेमध्ये मुली वाचवण्यासाठी शासनामार्फत सीसीटीव्ही बसवण्यात यावेत अशा आशयाचे निवेदन उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने देण्यात आले . या वेळी जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, बीड तालुका अध्यक्ष महिला आघाडी कावेरी जाधव, बीड तालुका उपाध्यक्ष निसार शेख, शहराध्यक्ष सोशल मीडिया उमेश पारिख, शहराध्यक्ष कोमल तुरुकमारे, दीपक वाघमारे व संघटनेतील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज, जि. बीड**
**एम ए जी विभाग**

क्र.२०२४/एमएजी/कावी/१२७९ दिनांक ०८/०८/२०२४

**जाहीरनामा**

सर्व जनता मौजे सारुळ ता. केज यांना जाहीर केले जाते की, सारुळ येथील जन्म पावलेला इसम नामे ढाकणे गणेश बबन याचा जन्म दिनांक ०३.०६.१९९९ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश ग्राम पंचायत सारुळ यांना देणे बाबत त्यांचा वडील नामे बबन दगडु ढाकणे यांनी या कार्यालयास दि. ०८.०७.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत ग्राम पंचायत सारुळ यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन ग्राम पंचायत सारुळ ता. केज यांना त्यांच्या मुलाचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.

२/- ढाकणे गणेश बबन याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पंचायत कार्यालय सारुळ ता. केज यांना जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित**
**कार्यकारी दंडाधिकारी, केज**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि.जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

जा.क्र.२०२४/नपघ/जा.प्र./कावी-२०३८ दिनांक २९/०८/२०२४

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार विनोद आसाराम देवडे रा. बोलेगाव ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे १. शेख शाहेद शेख जलील २. शेख मोबीन शेख नुरोद्दीन रा. ता. अंबड जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २०८१ दि. ०४/०८/२००८ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं २७०० दिनांक:- २९/०८/२०२४ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे १. शेख शाहेद शेख जलील २. शेख मोबीन शेख नुरोद्दीन रा. ता. अंबड जि. जालना नावावर असलेला गट नं (२४९) मधील प्लॉट नं. ०५ सि.स.नं. - ज्याचा मिळकत क्रं १००३/५ मधील एकुण क्षेत्र ७६.२५ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं. ०४, पश्चिम :- याच प्लॉट मधील भाग

दक्षिण :- १२ मीटर कॉलनी अंतर्गत रोड, उत्तरेस गट नं. २५२ मधील जमीन

या वरील चतु:सिमा मधील ७६.२५ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

शिक्का

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी, नगरपंचायत घनसावंगी**

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि.३० ऑगस्ट २०२४


# शेतकऱ्यांच्या तक्रारींचे एकाच कॉलवर होणार निवारण

**खुद्द केंद्रीय कृषिमंत्री ठेवणार देखरेख**

नवी दिल्ली : देशातील शतकऱ्यांच्या शेतीशी निगडीत समस्या सोडविण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रालयाकडून तक्रार निवारण हेल्पलाईन सुविधा सुरू करण्यात येणार आहे. या सुविधेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या योजना आणि शेतीशी संबंधित समस्यांवरील उपायांची माहिती मिळणार आहे. हे तक्रार निवारण सुविधा केंद्र कृषी भवन येथे उभारण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ही व्यवस्था खुद्द केंद्रीय कृषिमंत्र्याच्या देखरेखीखाली असणार आहे.

केंद्रीय कृषी मंत्रालयाकडून जारी केले जाणारी हेल्पलाईन सुविधा मध्य प्रदेश सरकारच्या सीएम किसानच्या धरतीवर काम करणार आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री असताना त्यांनी ही सुविधा सुरू केली होती. शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित समस्यांची तक्रार करण्यासाठी एक हेल्पलाईन क्रमांक देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांकडून आलेल्या तक्रारी सोडविण्याच्या सुचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात येतील. या संदर्भात कृषिमंत्री चौहान यांनी




म्हटले आहे की, देशातील शेतकऱ्यांना छोट्या-मोठ्या समस्यांचा सामना करावा लागतो. उदाहरणार्थ शेतकऱ्यांना पॉलिहाऊस बांधण्यासाठी अनुदान कसे मिळवायचे. यासारख्या समस्या येतात. या हेल्पलाईनद्वारे शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी एक संपूर्ण व्यवस्था केली जाईल.

## सीएम किसान मॉडेल

मध्य प्रदेश सरकारनेही सीएम किसान हेल्पलाईन नावाने अशीच सुविधा राज्यातील शेतकऱ्यांसाठी सुरू केली होती. याला तक्रार निवारण प्रणालीचे देशातील सर्वोत्तम मॉडेल मानले जाते. जेथे शेतकरी एका टोल फ्री क्रमांकावरून आपली तक्रार नोंदवू शकतात. या माध्यमातून शेतकरी राज्य सरकारच्या सर्व योजनांची माहितीही देखील मिळवू शकतात.

तसेच शेतकऱ्यांच्या ज्या काही समस्या असतील त्या वेळीच सोडविल्या जातील याचीही काळजी घेतली जाईल, असे चौहान यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी तक्रार नोंद केल्यानंतर प्रत्येक तक्रारारीसाठी एक विशेष रेफरेन्स नंबर दिला जाईल. या रेफरेन्स क्रमांकाच्या आधारे तक्रारीचे ट्रॅकींग करू शकतो. शेतकऱ्यांनी तक्रार दाखल केल्यानंतर संबंधित विभागाकडे ही तक्रार पाठविली जाईल. तसेच एका विशिष्ट कालमर्यादेत या तक्रारीचे निराकरण करण्याच्याही सुचना करण्यात येतील.

# शेतमाल साठवण्यासाठी 'गाव तेथे गोदाम' योजना; जाणून घ्या सविस्तर माहिती



राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाची सुरक्षित साठवणूक करण्यासाठी आणि नुकसान टाळण्यासाठी, तसेच कमी भावाने माल विकावा लागू नये यासाठी ''गाव तेथे गोदाम'' योजना जाहीर केलेली आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना कृषी प्रक्रिया उत्पादने आणि कृषी अवजारे साठवण्यासाठी गोदामांची सुविधा पुरवली जाईल. या योजनेची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना केली. योजनेच्या पहिल्या टप्प्यात नवीन १०० गोदामांचे बांधकाम आणि दुरुस्ती केली जाणार आहे. कांदा आणि कापसाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी प्रत्येकी २०० कोटी रुपयांच्या फिरता निधीची निर्मिती केली जाणार आहे.

'गाव तेथे गोदाम' योजनेचे उद्देश : शेतमालाची सुरक्षित साठवणूक करणे. शेतमालाचे नुकसान टाळणे. शेतमाल कमी भावाने विकावा लागू नये .ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे. योजनेची वैशिष्ट्ये : राज्यातील लहान, मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांसाठी ही योजना आहे. शेतमाल, प्रक्रिया उत्पादने आणि कृषी अवजारे साठवण्यासाठी गोदाम उपलब्ध होणार आहे.

या योजनेसाठी महाराष्ट्र सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अंतर्गत समिती स्थापन करण्यात आलेली आहे. नॅशनल बँक फॉर ॲग्रीकल्चर ॲण्ड रूरल डेव्हलपमेंटच्या सहकार्याने ही योजना राबवली जाते.

योजनेचे लाभ : शेतमालाची सुरक्षित साठवणूक करण्यासाठी गोदामांची सुविधा उपलब्ध. शेतमालाचे नुकसान टाळले जाऊन गुणवत्ता राखली जाते. शेतकऱ्यांना शेतमाल कमी भावाने विकावा लागू नये यासाठी मदत. शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा प्राप्त

पात्रता : राज्यातील सर्व प्रकारचे शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. (लहान, मध्यम आणि मोठे शेतकरी) योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करावा लागेल. अर्ज फॉर्म महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध असतील. आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा लागेल.

अधिक माहितीसाठी संपर्क : योजनेसाठी अधिक माहिती आणि अर्ज प्रक्रियेबद्दल जाणून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिकृत वेबसाइटवर संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी कृपया महाराष्ट्र शासनाच्या वेबसाइटला भेट द्या.

# पोकरा योजनेचा दुसरा टप्पा कधी सुरु होणार ?

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्यांना विविध बाबींचा लाभ देण्यासाठी ६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच सांगितले; परंतु पोकरा-२ सुरू कधी होणार, हा प्रश्न या निमित्ताने निर्माण झाला आहे.




गेल्या दोन महिन्यांपासून पोकरा योजनेचे काम थांबले आहे. योजना सुरु होण्याची वाट शेतकऱ्यांसह तत्कालीन कर्मचारीही पाहत आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजना २०१८ मध्ये सुरू करण्यात आली होती. सात वर्षांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला. अधिक अनुदान असल्याने अनेक शेतकऱ्यांनी या योजनेमध्ये सहभाग घेतला होता. पोकरा योजनेच्या कामांची अंमलबजावणी करण्यासाठी बीड शहरातील जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयातून पोकरा योजनेचे कामकाज केले जात होते. पोकरा योजना अंमलबजावणीसाठी चार कर्मचारी नियुक्त केले होते. योजनेचा पहिला टप्पा संपण्यापूर्वी, ज्या शेतकऱ्यांना घटक मंजूर त्यांनी वेळेत कामे सुरू नाही केली तर त्यांची मंजुरी रद्द केली होती. त्याचे एसएमएस ही शेतकऱ्यांना पाठविले होते. पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर दुसरा टप्पा सुरू होणार असल्याची चर्चा होती; परंतु हा प्रकल्प कधी सुरू होईल, त्याबाबत शासनाकडून कोणत्याही सूचना आल्या नाहीत. त्यामुळे, योजनेसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती संपुष्टात आली. सध्या या योजनेचे कामकाज बंद आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे काम थांबले आहे त्यांचे पोकरा-२ कडे लक्ष लागले आहे. दुसरा टप्पा सुरू होईल व पुन्हा काम मिळेल, या आशेवर कर्मचारी आहेत.

नवीन गावांचा समावेश : २०१८ पासून बीड जिल्ह्यात पोकरा योजनेला सुरुवात झाली, पहिल्या टप्प्यात पोकरा योजनेसाठी बीड जिल्ह्यातील ३९० गावांची निवड केली होती. या गावांची निवड करून प्रकल्प आराखडे तयार करून त्यास प्रकल्प यंत्रणा व कृषी विभागास पाठविण्यात आले होते. पोकरा योजना प्रकल्पातून वैयक्तिक लाभ, मृदा व जलसंधारणाची कामे व शेतकरी उत्पादक कंपनी, गटांच्या व्यावसायिक प्रस्तावास अर्थ साहाय्य देण्यात आले होते. आता पोकरा-२ साठी पूर्वीची गावे वगळता नवीन गावांचा समावेश केला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. केंद्रीय अर्थ व नियोजन खात्यास पोकरा प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात वातावरणातील बदलाच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यात यश आले आहे.

आता दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्प मंजुरीचा प्रस्ताव प्रकल्प संचालकांनी केंद्रीय अर्थ आणि नियोजन खात्यास डिसेंबर २०२३ मध्ये पाठविल्याची माहिती सूत्रांनी दिली. पोकरा-२ मध्ये जिल्ह्याची संख्या वाढविण्याबाबत विचार सुरू आहे. प्रकल्प संचालकांनी पाठविलेल्या अहवालास मंजुरी प्रकल्पाचे काम सुरू होणार आहे.

# झाडावरील केळीचे घड पिशवीने झाकण्यामुळे आश्चर्यकारक फायदे

केळी उत्पादक शेतकरी केळीचे घड पिशव्यांनी झाकतात. ही एक सामान्य कृषी पद्धत आहे ज्यामुळे फळांचे विविध पर्यावरणीय घटक, कीटक आणि रोगांपासून संरक्षण होते. सामान्यत: या पिशव्या पॉलिथिन, न विणलेले फॅब्रिक किंवा कागदासारख्या सामग्रीपासून बनविलेले असतात. केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने अनेक फायदे मिळतात. आधुनिक केळी शेतीमध्ये ही एक आवश्यक क्रिया आहे. केळीचे घड पिशवीने झाकण्याचे अनेक फायदे आहेत.

कीटक आणि रोगांपासून संरक्षण : केळीचे घड पिशवीत ठेवण्याचे मुख्य फायदे म्हणजे ते विविध कीटक आणि रोगांपासून संरक्षण प्रदान करते. फुलकिडी, फळमाशी आणि इतर कीटक यांसारख्या कीटकांमुळे केळीच्या फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते, ज्यामुळे चट्टे, डाग आणि इतर गुणवत्तेच्या समस्या निर्माण होतात. तसेच या किडी आणि रोगांना पिशव्या अडथळा म्हणून काम करतात, ज्यामुळे या कीटकांना फळांपर्यंत पोहोचण्यापासून प्रतिबंध होतो. आर्द्र वातावरणात जेथे करपा आणि सिगार रॉट सारख्या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो. बॅगिंगमुळे एक सूक्ष्म वातावरण तयार होते जे फळांच्या पृष्ठभागाशी ओलावा कमी करते, ज्यामुळे अशा रोगांचे प्रमाण कमी होते. यामुळे रासायनिक कीटकनाशकांची गरज कमी होते, त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होते. सुरक्षित, कीटकनाशकमुक्त फळ उत्पादित होते. याव्यतिरिक्त, पावसाळ्यात फळांना पिशव्या मातीच्या कणांपासून दूषित होण्यास प्रतिबंध होते.

फळांची चांगली गुणवत्ता : केळीची गुणवत्ता वाढवण्यात बॅगिंग महत्त्वाची भूमिका बजावते. पिशव्या धूळ, घाण आणि यांत्रिक नुकसान



यासारख्या बाह्य घटकांपासून फळांचे संरक्षण करतात. परिणामस्वरुप, केळी गुळगुळीत त्वचेसह एकसमान आकार विकसित करतात, त्यावर कोणतीही खूण किंवा डाग नसतात. निर्यातक्षम केळीसाठी हे अतिशय महत्त्वाचे आहे.

केळीची गुणवत्ता हा बाजारभावाचा एक महत्त्वाचा निर्धारक आहे. याव्यतिरिक्त, पिशव्या सूर्य प्रकाशामुळे होणारी सन बर्निंग कमी करण्यास मदत करते, थेट सूर्यप्रकाशापासून फळांचे संरक्षण करून, बॅगिंग केळीचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवते, ज्यामुळे ग्राहक आकर्षित होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना बाजारात जास्त भाव आणि अधिक नफा मिळतो.

फळांची चांगली वाढ आणि परिपक्वता : केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने फळांच्या सभोवतालच्या सूक्ष्म वातावरणावर सकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे फळांची वाढ, आकार आणि परिपक्वता चांगली राहते. पिशव्या फळांच्या सभोवतालच्या ओलाव्याची योग्य पातळी राखण्यास मदत करतात, जे फळ भरण्यासाठी आणि विकासासाठी आवश्यक आहे. हे नियंत्रित वातावरण फळांचे वजन आणि आकार सुधारू शकते, ज्यामुळे प्रति घड जास्त उत्पादन मिळते. शिवाय, बॅगिंगमुळे केळी मजबूत होतात आणि त्यांचे शेल्फ लाइफ वाढते, जे स्थानिक बाजारपेठ आणि निर्यात दोन्हीसाठी फायदेशीर आहे.

काढणी नंतरचे नुकसान कमी करणे : काढणीनंतर, विशेषतः हाताळणी, वाहतूक आणि साठवण दरम्यान केळीचे लक्षणीय नुकसान होते. कापणीपूर्व अवस्थेत बॅगिंगमुळे संरक्षणाचा अतिरिक्त थर देऊन हे नुकसान कमी करण्यात मदत होते. फळांचा दर्जा चांगला आणि नुकसानीचा प्रादुर्भाव कमी होतो. म्हणजे पॅकिंग अवस्थेत आणि वाहतुकीदरम्यान कमी फळे खराब होतात. याव्यतिरिक्त, बॅगिंगमुळे पिशव्या फळांमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे फळांचे वजन कमी होत नाही. उच्च तापमान असलेल्या भागात किंवा कोरडच्या हंगामात जेव्हा निर्जलीकरणाचा धोका जास्त असतो तेव्हा हे विशेषतः महत्त्वाचे आहे.

पर्यावरणास अनुकूल :कीटकनाशकांच्या अति वापरासाठी बॅगिंग हा पर्यावरण पूरक पर्याय आहे. रासायनिक हस्तक्षेपाची गरज कमी करून, ही पद्धत केळीच्या टिकाऊ उत्पादनात योगदान देते. हे सेंद्रिय आणि कीटकनाशक-मुक्त उत्पादनासाठी देते. बायोडिग्रेडेबल किंवा पुन्हा वापरता येण्याजोग्या पिशव्या वापरल्याने टिकाऊपणा आणखी वाढते, ज्यामुळे पर्यावरणीय प्रभाव कमी होतो.

खर्चात बचत :पिशव्यांमधील सुरुवातीची गुंतवणूक अतिरिक्त खर्चासारखी वाटत असली तरी कीटकनाशके, फळांचा दर्जा आणि उच्च बाजारभाव या दृष्टीने दीर्घकालीन फायदे बॅगिंगला किफायतशीर पर्याय बनवतात. उत्पादनात वाढ आणि काढणी नंतरच्या नुकसानीतील घट यामुळे बॅगिंगची गुंतवणूक अधिक योग्य वाटते.

हवामानास अनुकूल : अतिवृष्टी किंवा जोरदार वारा यांसारख्या परिस्थितीत, बॅगिंगमुळे फळांच्या घडांना अतिरिक्त संरक्षण मिळते. पिशव्या गारपीट, मुसळधार पाऊस आणि काही बाबतीत पानांमुळे होणारे नुकसान कमी करण्यास मदत करतात. यामुळे हवामानातील बदलांशी जुळवून घेण्यासाठी आणि बदलत्या हवामानाच्या पद्धती असूनही सातत्यपूर्ण उत्पादन सुनिश्चित करण्यासाठी बॅगिंग हा एक मौल्यवान उपाय आहे.




## महत्वाच्या घटना

१५७४ : गुरू रामदास शिखांचे चौथे गुरू बनले.
१६५९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपला मोठा भाऊ दारा शिकोह यांना फाशी दिली.
१८३५ : ऑस्ट्रेलियातील मेलबर्न शहराची स्थापना झाली.
१८३५ : अमेरिकेतील ह्युस्टन शहराची स्थापना झाली.
१९२८ : पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय स्वातंत्र्य लीग ची स्थापन करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध ब्रिटिश सैन्याने हाँगकाँगची जपानच्या अधिपत्यातुन सुटका केली.
१९७९ : सुमारे दहा लाख हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटांएवढी ऊर्जा निर्माण करुन 'हॉवर्ड-कुमेन-मायकेल्स' हा धूमकेतू सूर्याच्या पृष्ठबागावर आदळला. सूर्याच्या पृष्ठभागावर धूमकेतू आदळण्याची मानवी इतिहासातील ही पहिली नोंद आहे.
१९८४ : अमेरिकन अंतराळ यान डिस्कव्हरी ने पहिल्यांदा अवकाशात भरारी केली.
२००९ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने चंद्रयान-१ मोहीम ही औपचारिकरित्या समाप्त केली.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५९ : मुघल सम्राट अकबर यांचा मुलगा जहांगीर ४ यांचा जन्मदिन.
१५६९ : जहांगीर ४ था मुघल सम्राट (मृत्यू: २८ आक्टोबर १६२७)
१७२० : व्हिटब्रेड हॉटेल्स चे संस्थापक सॅम्युअल व्हिटब्रेड यांचा जन्म. (मृत्यू: ११ जून १७९६)
१८१२ : ब्यूएना विस्टा वाइनरी चे संस्थापक अगोगोस्टन हरसत्थी यांचा जन्म. (मृत्यू: ६ जुलै १८६९)
१८१३ : ना. धों. ताम्हनकर लेखक, बालसाहित्यिक (मृत्यू: ५ जानेवारी १९६१)
१८५० : काशिनाथ त्र्यंबक तेलंग प्राच्यविद्या संशोधक, न्यायमूर्ती, कायदेपंडीत, समाजसुधारक, अखिल भारतीय काँग्रेसचे एक संस्थापक, काँग्रेसचे चिटणीस (१८८५-१८८९), मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (१८९२), हिंदू कायद्यात सुधारणा होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भगवद्गीतेचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. (मृत्यू: १ सप्टेंबर १८९३)
१८७१ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १९ आक्टोबर १९३७)
१८८३ : जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद योगविद्येचे पुरस्कर्ते व शारीरिक शिक्षणतज्ञ, त्यांनी १९२४ मध्ये 'कैवल्यधाम' नावाची योगशिक्षणसंस्था स्थापन केली. संस्थेतील प्रयोगांची माहिती व्हावी यासाठी 'योगमीमांसा' नावाचे त्रैमासिक काढले. त्याचे ७ खंड प्रकाशित झाले आहेत. (मृत्यू: १८ एप्रिल १९६६ मुंबई)
१९०३ : भगवतीचरण वर्मा हिन्दी कथाकार, कादंबरीकार, कवी, एकांकिकाकार, पटकथाकार व नाटककार, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित लेखक (मृत्यू: ५ आक्टबर १९८१)
१९०४ : नवल होर्मुसजी टाटा उद्योगपती, पद्मभूषण १९६९
१९२३ : शंकरदास केसरीलाल ऊर्फ 'शैलेन्द्र' गीतकार (मृत्यू: १४ डिसेंबर १९६६)
१९३० : वॉरन बफे अमेरिकन उद्योगपती आणि दानशूर
१९३० : दशरथ पुजारी संगीतकार (मृत्यू: १३ एप्रिल २००८ डोंबिवली, मुंबई)
१९३४ : बाळू गुप्ते लेग स्पिन गोलंदाज (मृत्यू: ५ जुलै २००५)
१९३७ : मॅक्लारेन रेसिंग टीम चे संस्थापक ब्रुस मॅक्लारेन यांचा जन्म. (मृत्यू: २ जून १९७०)
१९५४ : बेलारूस देशाचे पहिले अध्यक्ष अलेक्झांडर लुकासेंको यांचा जन्म.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी रवीशंकर प्रसाद यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७३ : सुमेर गार्दी याने नारायणराव पेशवे यांची शनिवारवाड्यात हत्या केली. (जन्म: १० ऑगस्ट १७५५)
१९४० : सर जे. जे. थॉमसन इलेक्ट्रॉनच्या शोधाबद्दल १९०७ चे नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १८ डिसेंबर १८५६)
१९४७ : नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ 'कवी बी' त्यांची 'चाफा बोलेना, चाफा चालेना ' ही कविता खूप प्रसिद्ध आहे. (जन्म: १ जून १८७२)
१९५२ : भारतीय रिजर्व बँकेचे पहिले गव्हर्नर ओसबोर्न स्मिथ यांचे निधन.
१९८१ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (जन्म: ५ सप्टेंबर १९०७)
१९९४ : शंकर गोपाळ तथा शं. गो. तुळपुळे प्राचीन मराठी भाषेचे गाढे व्यासंगी, संत वाङ्मयाचे अभ्यासक व संशोधक, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख (जन्म: ५ फेब्रुवारी १९१४)
१९९८ : नरहर वामन तथा 'नरुभाऊ' लिमये स्वातंत्र्यसैनिक, निर्भिड पत्रकार व काँग्रेसचे तत्त्वनिष्ठ नेते (जन्म: ८ नोव्हेंबर १९०९)
१९९९ चार्ल्स ब्रॉन्सन अमेरिकन अभिनेता (जन्म: ३ नोव्हेंबर १९२१)
२००८ : प्रसिद्ध भरतीय उद्योगपती व बिर्ला कुटुंबातील सदस्य कृष्ण कुमार बिर्ला यांचे निधन.
२०१४ : भारतीय मार्क्सवादी इतिहासकार व आधुनिक भारतातील आर्थिक आणि राजकीय इतिहासातील तज्ञ बिपीन चंद्र यांचे निधन. (जन्म: २७ मे १९२८)
२०१५ : भारतीय विद्वान लेखक एम. एम. कळबुर्गी यांचे निधन. (जन्म: २८ नोव्हेंबर १९३८)

# माजलगाव येथे शेकापचा तब्बल दोन तास रास्ता रोको

## पिक विमा, कर्जमाफी द्या अन्यथा उपमुख्यमंत्र्यांचा ताफा अडवणार-भाई ॲड.नारायण गोले पाटील





**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव प्रतिनिधी गेल्या दहा वर्षात शेतकरी आणि शेती प्रचंड संकटात असून शेतकरी हजारोंच्या संख्येने आत्महत्या करत असताना शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यायला सरकार तयार नाही याउलट अंबानी अदानी यांना कोट्यावधी च्या खैराती वाटण्यात सरकार व्यस्त आहे, गेल्या दहा वर्षात शेतकऱ्याचा आत्महत्येचा आकडा हजाराच्या संख्येने वाढत असताना त्यावर तोडगा काढायला सरकारकडे वेळ नाही, गेल्या दहा वर्षात झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या केवळ शेतकऱ्याच्या शेतमालाला किफायतशिर हमीभाव न मिळाल्यामुळे झालेल्या असल्याने शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने कर्जमाफीसह पिक विमा, हमीभाव द्यावा अन्यथा अजित अजित पवार यांचा बिड जिल्ह्यात ताफा अडवणार असे मत शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी आंदोलनादरम्यान व्यक्त केले,

माजलगाव येथे परभणी फाट्यावर आज दिनांक २९ऑगस्ट रोजी सकाळी १०:०० वा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई ड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना सरसकट संपूर्ण कर्जमाफी, सरसकट पिक विमा देऊन शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव द्यावा, तसेच शेतकऱ्यांना सरसकट अनुदान द्या.जायकवाडी धरणाचे पाणी माजलगाव धरणात सोडा. लोकनेते कारखान्याकडील थकीत रकमेची पूर्ण रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करा, माजलगाव तालुक्यातील सर्वच पांदण रस्त्याचे मुरूम खडीकरण करा, अंबाजोगाई येथे सुरू असलेल्या शेकाप च्या अन्नत्याग आंदोलनाच्या मागण्या मान्य करा आदि मागण्यासाठी तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी आंदोलकांनी प्रचंड घोषणाबाजी करत शासनाचा निषेध व्यक्त केला, त्यावेळी वाहनाच्या तब्बल तीन किलोमीटर रांगा लागल्या होत्या. यावेळी आंदोलकांच्या मागण्याचे निवेदन मंडळ अधिकारी श्री पुराणिक व तलाठी आभारे यांनी स्वीकारले तर पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त लावला होता, या आंदोलनासाठी शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ,नुमान चाऊस,फजलुभाई भाई पटेल, बालासाहेब येवले,निलाराम टोळे, उल्हास घाटुळ,नितिन काळे, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका सह चिटणीस भाई सतीश शेजुळ, शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी, भाई मयूर पांचाळ,भाई राजेभाऊ शेरकर, भाई राजेश्वर मोरे,भाई माऊली चंदनशिव, भाई सुदाम चव्हाण, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई आनंत चव्हाण, भाई भास्कर कांबळे, संभाजी चव्हाण, श्रीराम शेवाळे, सोनाजी जाधव, नारायण पांचाळ, गणेश चव्हाण, बालासाहेब शिंदे, विक्रम सोळंके, श्रीराम कोरडे, जगदीश शिंदे, पांडुरंग वैद्य, लक्ष्मण बानाईत,मोहन शिंदे,सोनबा वगरे,आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले यावेळी परिसरातील हजारो शेतकरी बांधवांनी आंदोलनाला उपस्थिती लावली.

## वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाकडून शाळा बंद करण्याचा प्रयत्न, शाळा वाचण्यासाठी रॅली काढण्यात येणार

**जालना । प्रतिनिधी**

शहरातील अत्यंत प्रतिष्ठित म्हणून ओळख असलेल्या श्री एम.एस.जैन ही इंग्रजी माध्यमाची शाळा बंद करण्याचा निर्णय शाळेच्या संबंधित व्यवस्थापनाने घेतल्याने एकच खळबळ उडाली आहे. शाळा बंद करण्याबाबत शाळेच्या सूचना फलकावर पत्र डकविण्यासह पाल्यांच्या माध्यमातून पालकांनाही हे पत्र देण्यात आले आहे. तब्बल ४५ वर्ष जुनी असलेली व आज रोजीही सुस्थितीत असलेली शाळा अचानक बंद का करण्यात येत आहे, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे. ही शाळा श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या वतीने चालविली जाते. शाळा वाचविण्यासाठी आता मराठवाडा शिक्षक संघाने पुढाकार घेतला असून या संघाच्या माध्यमातून शाळेचे शिक्षक, कर्मचारी व पालक, आजी-माजी विद्यार्थी हे रविवारी १ सप्टेंबर रोजी शाळा बचाओ शांतता रॅलीत सहभागी होणार आहेत.

जैन इंग्लिश स्कूलमधून गत ४५ वर्षात हजारों विद्यार्थी शिक्षण घेऊन मोठे झाले आहेत. मात्र संस्था चालकांनी घेतलेल्या तुघलकी निर्णयामुळे अनेक माजी विद्यार्थ्यांमधूनही आश्चर्य व्यक्त केले जात आहे. हा निर्णय चुकीचा असून शाळा सुरू रहावी, यासाठी आपणही रॅलीत सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठवाडा शिक्षक संघाने या संदर्भात निवेदन प्रसिध्द केले असून याच्या प्रतिलिपी जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी, छत्रपती संभाजीनगर येथील शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथील शिक्षण संचालक कार्यालय, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, सदर बाजार पोलिस निरीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय जालना तसेच श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघालाही निवेदन पाठविण्यात आले आहे.

निवेदनावर शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, सचिव संजय येळवंते, उपाध्यक्ष जगन वाघमोडे, सहसचिव दीपक शेरे, कार्याध्यक्ष एफ.ए.सय्यद, केंद्रीय सदस्य ज्ञानोबा वरवट्टे, प्रेमदास राठोड, सदस्य पी.यु.काकड, गणेश चव्हाण, आरेफ कुरेशी, नारायण मुंडे, भगवान धनगे, हाकीम पटेल, शेख खलील, गणेश म्हेत्रे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.रविवारी १ सप्टेबर रोजी सकाळी १०:०० वाजता श्री एम.एस. जैन इंग्लिश स्कूलच्या गेटपासून सुभाष चौक, महावीर चौक, मामा चौक, वीर सावरकर चौक, सुभाष रोड, फूल बाजार, सराफा, कादराबाद, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व शेवटी गुरू गणेश भवनच्या प्रवेशद्वारा समोर या शांतता रॅलीचा समारोप होणार आहे.

## चोरांचा शेतकऱ्यांचे हातपाय बांधून सोने,रोख रक्कमेसह शेळ्यांची चोरी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील हारकी निमगाव येथील शेतकरी यादवराव भागुराव शिंदे (५५) यांना दिनांक २८ बुधवार रोजी रात्री अंदाजे १२ वाजण्याच्या दरम्यान शेतातील शेड मध्ये कोडून हातपाय बांधुन चोरट्यांनी चाकुनी वार करुन गंभीर जखमी केले. व शेड मधील ६,शेळ्या १२ कोंबड्या, गळ्यातील सोन्याचा ओम, रोख रक्कम चोरीस शेड मध्ये बांधलेल्या ६शेळया १२ कोंबड्या, गळ्यातील सोन्याचा ओम, व रोख रक्कम ७ हजार चोरट्यांनी चोरी केल्याची घटना हरकी निमगाव येथे घडली असुन वस्ती सह या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



. मात्र यां घटने संदर्भात माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे अनभिज्ञ असल्याचे समजत आहे: ग्रामीण पोलीस ठाण्याकडून ना दाद ना फिर्याद.

ज्या दिवशी चोरीची घटना घडली त्या मध्य रात्री आकाशात तून ड्रॉन खाली उतरले असल्याचे येथील नागरिकांनी सांगितले. तसेच मध्य रात्री शेतकरी यांच्या वर पाळत ठेवू शेड मध्ये बांधलेल्या ६ शेळया १२ कोंबड्या, रोख रक्कम, गळ्यातील सोन्याचा ओम चोरट्यांनी हात पाय बांधून चोरी झाल्याची घटना हरकी निमगाव येथे घडली आहे.

याबाबत ग्रामीण पोलीस ठाण्या कडून ना दाद ना फिर्याद. ग्रामीण पोलीस ठाणे माजलगाव कडून चोरीचा गुन्हा नोंद करुन मुदे माल मिळवून देण्यात यावा. भयमुक्त वातावरण करण्यात यावे. असे नागरिका कडून मागणी केली जात आहे.

# आपणास मिळालेल्या मनुष्य जन्माचे सार्थक करा

## श्री.१०८ प.पू.ष.ब्र.शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांचे अमृत उपदेश



**बीड। प्रतिनिधी**

**येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे काल दि २८/८/२०२४ बुधवार रोजी श्रावण मासानिमित्त गुरूवर्य प.पु.ष.ब्र.१०८ तपोरत्न श्री. शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी तमलूरकर ता.देगलुर जि.नांदेड यांचे ४० वे अनुष्ठान चालू आहे. या अनुष्ठानात शिवपाठ , सामुहिक ईष्टलिंगपुजा, गाता भजन व गुरूवर्यांचे अमृत उपदेश व श्रोते यांना शिवमहिमा महाराज सांगत आहेत.**







आपल्याला मिळालेला हा मनुष्य जन्म खूप दुर्मिळ आहे मनुष्य जीवन मिळण्यासाठी लक्ष ८४ योनीचा फेरा पूर्ण करावा लागतो त्यानंतर हा मनुष्य देह मिळतो या मनुष्य देहामध्येच शिव आराधना, उपासना, अर्चना, नाम ध्यान म्हणून फक्त मनुष्य देह प्राप्त झाल्या नंतरच करता येते या आपल्या आराध्य सेवेमुळे पुन्हा भगवंत भेट होईल हीच एक अपेक्षा हृदयाला असते नरदेहाला आल्यानंतर आपण आपल्या जीवनामध्ये व्यर्थ चिंता करायची नाही यावर बोलताना महाराजांनी चिंता आणि चिता या दोन शब्दावर उदाहरणे देऊन महाराजांनी श्रोत्यांना समजावून सांगितले महाराज म्हणाले मनुष्य देह मिळाल्यानंतर चिंता करत बसलो तर आपल्याला आपल्या मध्ये असणारे चातुर्य संपते आपल्यातली ऊर्जा नष्ट होते आणि चिंता केल्याने काहीही फरक पडत नाही उलट चिंता केल्यानेच एक दिवस चितेवर जावं लागतं हेही महाराजांनी सांगितले मनुष्य जीवनामध्ये मूलभूत रोटी कपडा और मकान या तीन गोष्टी आहेत या तीन गोष्टींचा योग्य वापर करून आपलं जीवन सुखी करा जीवनात हव्यास करू नका आणि फसव्याच्या नादी लागू नका असा सल्लाही दिला. श्रीक्षेत्र कपिलधार येथे चालू असलेल्या श्रावण मास अनुष्ठान रुद्र पूजा व गुरु माऊलींचे अमृत उपदेश ऐकण्यासाठी आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा आदी विविध राज्यातून तसेच पंचक्रोशीतील असंख्य भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्या भ्रष्ट कामावर आप्पासाहेब जाधवांचा प्रहार

## जनमानसांच्या मनातील संताप केला व्यक्त, गर्दीचे रेकॉर्ड मोडीत दहीहंडी चा उत्सव साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

नगर परिषदेने कोट्यावधी रुपयांचा विकास निधी येऊनही शहराचा अपेक्षित विकास केलेला नाही. शहरातील मूलभूत प्रश्न प्रलंबित असताना मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण मनमानी कारभार हाकत आहेत. आपल्याला कुणी मालक नाही या आविर्भावात वागणाऱ्या चव्हाणच्या पापाच्या घडा लवकरच फुटेल असा घणाघात आप्पासाहेब जाधव यांनी केला.

राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी माजलगाव शहराच्या विकासासाठी प्रचंड मोठा निधी



दिला. मात्र या ठिकाणी प्रशासक असताना स्वतःला मालक समजणाऱ्या मुख्याधिकारी यांनी मनमानी करत या विकास कामाचा बट्ट्याबोळ करण्याचे काम केले. आज शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य आहे. रस्त्यावर कुत्रे, जनावरे वावरत आहेत. सणा सुदीच्या दिवसात पथदिवे बंद आहेत. वेळेवर प्यायला पाणी मिळत नाही. नगरपरिषदेत कामानिमित्त गेलेल्या सामान्य माणसाला भेटत नाहीत. स्वतःच्या तुंबड्या भरन्यात व्यस्त असलेल्या मुख्याधिकारी यांना सामान्य माणसाच्या त्रासाचे काही एक देणेघेणे नाही. त्यांच्या काळात नगर परिषदेचा कारभार पूर्ण बोकाळला आहे. शहरात कुठेही स्वच्छताग्रह नाही. त्यामुळे महिलांची मोठी अडचण आहे. नागरिकांचीही अडचण आहे. जनावरांचा रस्त्यावरून मुक्त वावर आहे. यामुळे महिला लहान मुलांना त्रास होत आहे. त्यातून अनेक महिला जखमी झाल्या आहेत. प्यायला नियमित स्वच्छ पाणी नाही. नाल्या तुंबलेल्या आहेत. सर्वत्र घाण आहे. ज्यामुळे रोगराई पसरत आहे. रस्त्यावर लाईट नाही. अशा विविध समस्यांनी नागरिक त्रस्त आहेत. परंतु या मुख्याधिकाऱ्याला काही देणे घेणे. त्यामुळे आपल्या सर्वांच्या सहकार्याने माजलगावचा हा लागलेला कलंक धुऊन काढून. अशा आरोपाच्या फेरी झाडत आप्पासाहेब जाधव यांनी मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांना दहीहंडीच्या जाहीर कार्यक्रमात चांगलेच धो धो धुतले. दरम्यान माजलगावचे नाव उंच नेण्यासाठी आपण प्रयत्न करूत. विकासासाठी आपण कायम पुढे राहुत अशी ग्वाही देत तुम्ही मला साथ द्या. असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या दहीहंडी उत्सव स्थळी नागरिकांची मोठी गर्दी होती.

## खानापूर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



माजलगाव (प्रतिनिधी) तालुक्यातील खानापूर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सिताराम क्षीरसागर यांच्या संयोजना खाली झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी नानासाहेब घोडके हे होते तर उद्घाटक म्हणून कार्यारंभ चे संपादक शिवाजी रांजवन हे होते. या जयंती उत्सव सोहळ्याची सकाळी १०.३० वाजता माजलगाव सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन अभय होके पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहणा ने सुरुवात झाली दिवसभर विविध कार्यक्रम घेऊन संध्याकाळी सुमित साळवे यांच्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावरील गीत गायनाच्या कार्यक्रमाने या जयंती उत्सव शाळेची सांगता करण्यात आली या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस कचरू तात्या खळगे पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे, छगन क्षीरसागर, आप्पा भारस्कर, यांची प्रमुख उपस्थिती होती तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धीरज शिरसाट सुनील कांबळे पवन भिसे चिकू सातपुते वैभव क्षीरसागर गोपीनाथ शिरसागर यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रमेश जाधव सर यांनी केले--

# डीजेच्या तालावर तरुणाई थिरकली...

## जयदत्त सुरेश धस मित्र मंडळ आयोजित भव्य दहीहंडी उत्सवास तोबा गर्दीने आष्टीकरांचे लक्ष वेधले

**आष्टी । प्रतिनिधी**

हाथी घोडा पालकी,जय कन्हैया लाल की. या जय घोषाने डीजेच्या तालावर थिरकलेली तरुणाई तर सात थरांची अंगावर शहारे आणणारा दहीहंडी पथकांचा तो जल्लोष आणि हा नेत्र दीपक सोहळा पाहण्यासाठी उसळलेल्या जनसागराने आष्टी करांचे पारणे फेडत तौबा गर्दीने लक्ष वेधले.युवा नेते जयदत्त सुरेश धस मित्र मंडळ आयोजित भव्य दहीहंडी महोत्सव २०२४ या कार्यक्रमास माजीमंत्री सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती. तर श्रीकृष्ण पूजा करून भव्य दहिहंडी कार्यक्रमांचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास धस,भाजपा तालुकाध्यक्ष अ‍ॅड.साहेबराव म्हस्के, युवा नेते सागर धस,युवा नेते तथा सरपंच राधेश्याम धस, प.स.माजी उपसभापती अजिनाथ सानप,माजी प.स.सदस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे यशवंत खंडागळे,एन. टी.गर्जे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते





### आष्टीकरांचे दहीहंडी महोत्सवातील तोबा गर्दीने लक्ष वेधले

पुणे,मुंबई या धर्तीवर मोठमोठ्या शहराप्रमाणे आष्टी शहरात प्रथमच भव्यदहीहंडी महोत्सव आपल्या ग्रामीण भागात पार पडला आणि या उत्सवास तरुणाईने तौबा गर्दी करत लक्ष वेधले. अष्टीकरांनी समाधान व्यक्त करत युवानेते जयदत्त सुरेश धस मित्र मंडळाच्या अतिशय शिस्तबद्ध नियोजनाबदल उपस्थितांनी आभार मानले.

### दहीहंडी महोत्सवाच्या नेत्रदीपक सोहळ्याने डोळ्याचे पारणे फिटले

संपन्न झाले.

इंदापूर येथील व्यंकटेश पथकाच्या गोपाळांनी ही दहीहंडी फोडण्याचा मान पटकावित स्पर्धेत बाजी मारली.यावेळी विजेत्या संघास रोख स्वरूपात बक्षीस आणि सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.आष्टी शहरात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा धार्मिक कार्यक्रमांनी विविध ठिकाणी उत्साहात पार पडला.यावर्षी प्रथमच आष्टी शहरात पंचायत समिती प्रांगणात बुधवार (दि.२८) रोजी जयदत्त धस मित्रमंडळाच्या वतीने दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.दुपारी ४ वाजेपासूनच या महोत्सवाचा उत्साह पाहायला मिळाला.या दहिहंडी निमित्त प्रमुख आकर्षक बॉलीवूड अभिनेत्री सई मांजरेकर मराठी तारका मानसी नाईक श्री स्वामी समर्थ मालिकेतील भूमिका साकारणारी मोहिनी अवसरे प्रसिद्ध नृत्यांगना झेबा शेख यांची तर माजीमंत्री सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती.लेजर लाईट शो, डि.जे.च्या तालावर थिरकणारी तरुणाई आणि आकर्षक विद्युत रोषणाई व फटाक्यांची आतषबाजी याने या सोहळ्याची दिमाखात सुरुवात झाली.या महोत्सवात दोन संघांनी सहभाग घेत आपापली कामगिरी यावेळी चांगल्या पद्धतीने करून दाखविली.प्रथमतः इंदापूर येथील व्यंकटेश गोविंदा पथक व भिगवण येथील शिवरूद्र गोविंदा पथकाने सलामी दिली.यानंतर इंदापूर येथील व्यंकटेश गोविंदा पथकाने ७ थर लावून ही दहीहंडी फोडली आणि विजयाचे मानकरी ठरले. याप्रसंगी माजी शिक्षण सभापती उध्दव दरेकर, जि.प.सदस्य माऊली जरांगे,सभापती बद्रीनाथ जगताप,ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भवर, गणेश शिंदे, नगराध्यक्ष जिया बेग,पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव,माजी सभापती अशोक इथापे, महेश हंबर्डे,अमोल शिंदे,युवा नेते अभिजीत शेंडगे सरपंच उद्धव पवार,सरपंच अजित घुले,महेश खकाळ,युवराज बर्डे, माजी सरपंच राम धुमाळ,यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.नियोजनबद्ध आणि शिस्तबध्द आयोजन केलेल्या जयदत्त धस मित्र मंडळाच्या दहीहंडी महोत्सवाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

---

# आम्ही चळवळीचे वारसदार आहोत!

## जयंती: अण्णाभाऊ साठेंना अभिप्रेत असलेला हाच तो समाज

**बीड । प्रतिनिधी**

जग बदल घालुनी घाव,सांगून गेले मला भीमराव असा हुंकार साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठेंनी दिला होता. परंतू समाजाने या शब्दांना नीटपणे समजून घेतले नाही. याउलट नेत्यांनीही समजून सांगितले नाही.त्यामुळे समाजाचे म्हणावे तेवढे परिवर्तन झाले नाही.असे असले तरी, अण्णाभाऊ साठेंना अभिप्रेत असलेली परिवर्तन जयंती माजलगाव तालुक्यातील निपाणी टाकळी येथे साजरी झाली आहे. त्यामुळे देशात परिवर्तन जयंती म्हणून आदर्श निर्माण झाली आहे.

माजलगाव तालुक्यातील निपाणी टाकळी येथे साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी




जयंती गुरुवार (दि.२९) ऑगस्ट रोजी साजरी करण्यात आली. युवा कार्यकर्ते शंकर आलात यांच्या संकल्पनेतून हा साहित्यसम्राट महोत्सव संपन्न झाला. विशेष म्हणजे या जयंतीत पंचशील ध्वज, निळा झेंडा आणि पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेला समाज दिसून आला.त्यामुळे साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती खऱ्या अर्थाने परिवर्तनाच्या दिशेने निघालेली ठरली आहे. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना अभिप्रेत असलेला समाज, या जयंतीने राबविलेल्या उपक्रमातून दिसून आला.अण्णाभाऊ साठेंच्या विचारातून परिवर्तन घडविणाऱ्या समाजाने बीड, नव्हे राज्य नव्हे तर देशात अशी जयंती पहिल्यांदाच साजरी केली आहे. एरवी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करत असताना झेंडा कोणता, नियोजन कसे असावे यावर चर्चा होते. मात्र अण्णाभाऊ साठे यांना नेमके काय अभिप्रेत होते. यावर चर्चा होत नाही. परंतु निपाणी टाकळी येथील साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीने त्या लोकांना परिवर्तन काय असते हे दाखवून दिले आहे. यावेळी या रॅलीचे उद्घाटन मा, अमोल भैया शेरकर यांनी केले तसेच या रॅलीला आवर्जून उपस्थित अंकुश अण्णा जाधव धम्मानंद ◀◀ पान ३ वर

# हनुमान वस्तीवरील रस्त्याप्रकरणी मंडळ अधिकाऱ्याची मनमानी

**येवता । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जिवाचीवाडी अंतर्गत हनुमान वस्तीवरील रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी वरीष्ठ अधिका-यांनी मंडळ अधिकारी सुहास डोरले यांची नियुक्ती केली होती.या प्रकरणी मंडळ अधिकारी हे बणवाबणवी करून वरिष्ठ अधिका-यांची दिशाभुल करीत आहेत.

केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील हनुमानवस्ती साठी तत्कालीन तहसीलदारांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे रस्ता देण्याऐवजी या रस्त्याला विरोध करणा-यांशी संगणमत करून मंडळ अधिकारी मनमानी कारभार करीत आहेत.तहसिलदार यांचे




### १३ दिवसापासुन अहवाल गुलदस्त्यात

कडुन पुढील तारीख घेण्यासांठी मंडळ अधिकारी यांनी १६ ऑगस्टठं रोजी प्रत्यक्ष घडलेल्या कामकाजाचा अहवाल सादर करणे गरजेचे आसतानाही मंडळ अधिकारी यांनी १५ दिवस झाले तरी अद्याप अहवाल तहसीलदार यांना सादरच केला नाही.यावरुन मंडळ अधिकारी हे आपल्या कर्तव्यात कसुर करीत असल्याचे सिद्ध झाले आहे. अधिका-यांच्या आदेशाचे पालन नकरता मनमानी कारभार करुन अधिका-याच्या आदेशाला केराची टोपली दाखवित आहेत.

१५ दिवसापासून अहवाल सादर होईना...

वरीष्ठ अधिका-यांच्या आदेशावरुन १६ ऑगस्ट रोजी नायब तहसिलदार आशा वाघ,मंडळ अधिकारी सुहास डोरले,तलाठी उत्रेश्वर घुले,भुमी अभिलेखचे रविंद्र विभुते यांनी हनुमान वस्ती येथे येऊन केलेल्या कामकाजाचा अहवाल तहसीलदार यांना सादर करणे आवश्यक आसताना अद्याप अहवाल प्राप्त झाला नसल्याची माहीती तह.जमा-२ च्या श्रीमती कावळे मॅडम व तहसिलदार सचिन देशपांडे यांनी सदर प्रतिनीधीशी बोलताना दिली,तर मंडळ अधिकाऱ्यांशी ◀◀ पान ३ वर

---

# बीड फ्रेंडस स्पोर्ट आयोजीत एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत आर्यन कीत्तूरे नाबाद अर्धशतक

**बीड । प्रतिनिधी**

१४ वर्षाखालील गटातील मुलांच्या फ्रेंडस्? स्पोर्ट अकॉडमी आयोजीत एकदिवसीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना प्रेसिंडट क्लब बीड विरूध्द रायझिंग क्लब गंगाखेड-परभणी या दोन संघात खेळवण्यात आला यावेळी मॅजीक फोटो स्टूडीओचे संस्थापक दत्ता वाघ यांच्या हास्ते नाणेफेक करण्यात आली प्रेसिंडट क्लबने नाणेफेक जिंकूण प्रथम फलंदाजी केली यीवेळी मुलांच्या संघात स्नेहल जगताप या बीडच्या मुलीने खेळतांना उत्कृष्ट फलंदीजी करत २१ धावा केल्या समर्थ २९, तर कैवाडे या खेळांडूने ५६ धावा करत संघाची धावसंख्या ३२.४ षटकांत सर्व बाद १४८ केल्या यावेळी रायझिंग संघाकडून खेळणारी श्रावणी काळे



हीने गोलंदाजी करतांना प्रेंसिडंटचे तिन गडी बाद केले व आर्यन कीत्तूरे यांच्या संयमी नाबाद ६० धावा १२० चेंडूत करत रायझिंग संघाला ३८.३ षटकांत तिन गड्याच्या मोबादल्यात हा सामना जिंकवला यावेळी यश सोनवलकर यांने २२ धावा, तर अदर्श चोरगूडे यांने १० धावा केल्या संघासाठी वयक्तिक नाबाद ६० धावा व एक गडी बाद करणारा आर्यन केतूरे हा सामनाविर ठरला त्यास प्रेंसिडट क्लबचे कोच आतिक कुरेशी, चंद्रकांत हूरकूडे, विवेक घुगे, सुरज धांडे, यांच्या हास्ते देण्यात आला यावेळी फ्रेंडस स्पोर्ट अकॉडमीचे अध्यक्ष अ‍ॅड शैलेश जाधव यांनी दोन्ही संघाचे व उपस्थितांचे आभार मानले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नव्या पिढीला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे कार्य व विचार माहिती व्हावेत, या उद्देशाने साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त व्याख्यान आणि समाजातील गुणवंत



विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. या सोबतच विशेष उपलब्धी मिळवलेल्या व्यक्तींचाही सन्मान कार्यक्रमात करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सवाच्या कार्यक्रमानिमीत्त प्रा. डॉ. पांडुरंग गादेकर यांच्या 'साहित्याचे शिल्पकार डॉ. अण्णाभाऊ साठे' या पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार पृथ्वीराज साठे तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. राजकुमार मस्के (उदगीर), डॉ. कमलाकर कांबळे हे उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम नगरपरिषदेच्या लोकनेते विलासराव देशमुख सभागृहात दिनांक ३१ ऑगस्ट शनिवार रोजी सांयकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. तरी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन 'जोशाबा' पुरुष बचत गटाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंबाजोगाईत निघाला भव्य हिंदू जन आक्रोश मोर्चा

### बांगलादेशातील हिंदूंना संरक्षण देण्याची आणि बांगलादेशी घुसखोरांना हाकलून देण्याची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बांगला देशातील हिंदूवर होणारे हिंसक अत्याचार, देशात घडणाऱ्या लव्ह जिहादच्या घटनांच्या निषेधार्थ अंबाजोगाईत बुधवारी (दि.२८) प्रचंड मोठा हिंदू जन आक्रोश मोर्चा निघाला. या मोर्चात हजारोंच्या संख्येने हिंदू बांधव सहभागी झाले होते. यावेळी आंदोलकांनी इविध मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना दिले.

बांगला देशातील हिंदूवर होणाऱ्या हिंसक अत्याचाराच्या अनेक घटना उघडकीस येत आहेत. यासह कोलकातामध्ये



झालेल्या भगिनी अत्याचार व हत्या प्रकरण व ऊरण मधील भगीनीची लव्ह जिहाद अत्याचार व हत्या तसेच अरविंद वैद्य याची जिहादी वृत्तीने केलेली हत्याच्या निषेधार्थ ◀◀ पान ३ वर

---

# "येता संकट बालकावरी १०९८ मदत करी"

### बालकांसाठी चाईल्ड हेल्प लाईन सेवा संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित

**बीड । प्रतिनिधी**

संकटग्रस्त बालकाना २४७ हेल्पलाईन सेवा उपलब्ध करून देण्यात आली असून सेवेचा लाभ बालक स्वतः घेवू शकतो किंवा इतर कोणीही या सेवेद्वारे बालकाला मदत मिळवून देऊ शकतात. १०९८ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून संकटग्रस्त बालकांना मदत करावी असे आवाहन महिला व बाल विकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले आहे,

आपल्या आजूबाजूला आपल्याला जर बालकामगार, बाल भिक्षेकरी, लैंगिक अत्याचार ग्रस्त बालके, हरवलेली बालके तसेच सापडलेली बालके, मदतीची आवश्यकता असलेली संकटग्रस्त बालके आढळल्यास अशा बालकांना त्वरित आवश्यक मदत कोठून व कशी मिळवून देता येईल, या करिता कोठे संपर्क करावा या बाबते सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम असतो. अशा संकटग्रस्त बालकांना त्वरित मदतीसाठी भारत सरकार, महिला व बाल विकास विभाग नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग यांच्यामार्फत ० ते १८ वयोगटातील कोणत्याही प्रकारच्या ◀◀ पान ३ वर

# आष्टी मतदारसंघात प्रस्थापित पुढाऱ्यांच्या विरोधामध्ये वातावरण असल्याने जनतेत परिवर्तनाची लाट- अ‍ॅड.नरसिंह जाधव

**बीड । प्रतिनिधी**

पाटोदा तालुका व शिरूर या तालुक्याला फक्त १८ महिन्याचा काळ सोडला तर आज पर्यंत आमदारकी मिळालेली नाही. त्यामुळे या भागातील लोकांची नैसर्गिक मागणी अशी आहे की पाटोदा व शिरूर तालुका शरदचंद्रजी पवार साहेब यांनी उमेदवारी द्यावी. आष्टी मतदारसंघात देखील प्रस्थापित लोकांच्या विरोधामध्ये वातावरण असल्यामुळे येणाऱ्या निवडणूकीत नवा चेहरा म्हणून जनता या वेळेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाचा उमेदवार निवडून देईल अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधी सेलचे मराठवाडा उपाधक्ष्य



अ‍ॅड. नरसिंह जाधव यांनी पाटोदा येथे पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केली.

या वेळी पत्रकार परिषदेत बोलताना अ‍ॅड. नरसिंह जाधव म्हणाले की, आगामी विधानसभा निवडणुकीत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे आपण उमेदवारीची मागणी केली असून, पक्षाने संधी दिल्यास आपण निवडणूक लढविणार असल्याचे सांगून, मतदार संघातील जनतेनी आपल्याला संधी द्यावी असे आवाहन करून आपली निवडणूक लढविण्याबाबतची भूमिका पत्रकारांसमोर ऍड. नरसिंह जाधव यांनी स्पष्ट केली. पुढे बोलताना अ‍ॅड. जाधव म्हणाले की, २०२४ मध्ये आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातर्फे मी इच्छुक उमेदवार असून आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या पक्षाकडे मला आष्टी विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी द्यावी यासाठी मागणी केलेली आहे. आष्टी मतदार संघ हा आष्टी,पाटोदा व शिरूर चा अर्धा भाग मिळून जवळजवळ ४४१ बूथ आहेत आष्टी मतदारसंघांमध्ये तिन्ही तालुक्याचा विचार केला असता आजपर्यंत कुठलाही मोठा उद्योगधंदा उदाहरणार्थ एम.आय.डी.सी. तसेच शेतीपूरक ◀◀ पान ३ वर

# खेळ हा विद्यार्थी जीवनात नेतृत्व व संघभावना विकसित करतो -प्रा. प्रसाद देशमुख



**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

येथील कै .लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात 'राष्ट्रीय क्रीडा दिना'निमित्त क्रीडामहोत्सव उद्घाटन सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ . व्ही व्ही देशपांडे होत्या . या सोहळ्याचे उद्घाटक म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा . प्रसादजी देशमुख होते तर संस्थेच्या संचालिका सौ छायाताई देशमुख यांची विशेष उपस्थिती लाभली. हॉकी या क्रीडा प्रकारात भारताचे नाव उज्ज्वल करणारे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन राष्ट्रीय क्रीडादिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. मेजर ध्यानचंद व संस्थेचे ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शुक्रवार दि.३० ऑगस्ट २०२४ । पान ७

# बनावट टेलिफोन एक्स्चेंज सेंटरचा पर्दाफाश ! एटीएसची कारवाई ; ३७८८ सिमकार्ड, नऊ राऊटर आणि लॅपटॉप जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

कोंढव्यातील मिठानगरमध्ये सुरू असलेल्या बनावट टेलिफोन एक्स्चेंज सेंटरचा दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) पर्दाफाश केला आहे. पथकाने तब्बल तीन हजार ७८८ सीमकार्डसह सीम बॉक्स, वायफाय, सीमबॉक्स चालवण्यासाठी लागणारा अँटिना आणि लॅपटॉप असा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाई एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.




नौशाद अहमद सिद्दिकी (वय ३२, रा. कोंढवा) असे आरोपी तरुणाचे नाव आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात घातपाती कारवायांच्या संभाव्य घटनांच्या अनुषंगाने पोलिस आणि तपास यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली. एटीएसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विदेशातून भारतात येणारे इंटरनॅशनल कॉल भारतातील यंत्रणेला समजू न देण्यासाठी बनावट टेलिफोन एक्स्चेंज सेंटरचा वापर केला जात होता. त्याकरिता या सीमकार्डचा वापर केला जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. कोंढवा येथील मीठानगरमध्ये असलेल्या 'एमए कॉम्प्लेक्स' परिसरात हे बनावट टेलिफोन एक्स्चेंज सेंटर चालवले जात होते. ताब्यात घेण्यात आलेल्या नौशादकडे चौकशी सुरू करण्यात आली आहे.

यापूर्वी कोंढवा भागात अनेक वेळा दहशतवाद विरोधी कारवाया करण्यात आलेल्या आहेत. काही दहशतवाद्यांना या परिसरातून अटक देखील झाली आहे. तसेच, नुकतेच ईसिसचे मोड्यूल देखील उघडकीस आले होते. त्या अनुषंगाने एटीएसने केलेली कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. या बेकायदा टेलिफोन एक्स्चेंज चालवून त्याने दूरसंचार विभाग आणि भारत सरकार आणि मोबाईल कंपन्यांची आर्थिक फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपी नौशाद काही महिन्यांपूर्वी पुण्यातून राजस्थानला गेला होता. त्याला तेथून ठाणे पोलिसांनी अटक केली होती. सध्या तो ठाणे पोलिसांच्या ताब्यात आहे. त्याचा ताबा एटीएसकडून घेतला जाणार आहे. त्याने राहत्या घरातच हा सर्व सेटअप तयार केलेला होता. राजस्थानला जाण्यापूर्वी त्याने हे सर्व साहित्य काढून घरातच ठेवले होते.

एटीएसला याबाबत खबऱ्यायामार्फत माहिती मिळाली. त्यानुसार, छापा टाकून साहित्य जप्त करण्याची कारवाई करण्यात आली. एटीएसने दहशतवादी कृत्यास मदत होईल, असे अनधिकृत टेलिफोन एक्स्चेंज सेंटर उद्धस्त केल्याचे एटीएसने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नमूद आहे.

# काश्मीर खोऱ्यात यंदाही तीन ठिकाणी साजरा होणार गणेशोत्सव; युवा उद्योजक पुनीत बालन यांनी दिली माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीर खोऱ्यात यंदाही सलग दुसऱ्या वर्षी सार्वजनिक गणशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे यावर्षी आता तीन ठिकाणी हा उत्सव साजरा होणार असून या मंडळांना येत्या शनिवारी (दि. ३१) पुण्यातील मानाच्या गणपतीच्या मूर्ती सुपूर्द करण्यात येणार आहेत. पुणे शहरातील सात गणेश मंडळांमध्ये पुणे येथील कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग गणपती, केसरी वाडा हे मानाचे पाच गणपती तसेच श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती आणि अखिल मंडई मंडळ या सात मंडळांचा समावेश आहे.



श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'चे उत्सवप्रमुख आणि विश्वस्त पुनीत बालन यांनी ही माहिती दिली. पुण्यातून मुहर्तवेढ रोवला गेलेला सार्वजनिक गणेशोत्सव साता समुद्रपार पोहचला आहे. जगभरात अनेक ठिकाणी गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. मात्र, भारताचा अविभाज्य भाग असलेला काश्मीर खोऱ्यात मात्र गेल्या ३४ वर्ष गणेशोत्सव साजरा केला जात नव्हता, ही बाब लक्षात घेऊन काश्मीरमध्ये पुन्हा गणेशोत्सव साजरा करण्यासाठी युवा उद्योजक पुनीत बालन यांनी पुढाकार घेतला.

पुण्यातील मानाच्या सात गणपती मंडळांनी एकत्र येत त्यासाठी पाऊल टाकले आणि गतवर्षी कश्मीरमधील लाल चौकात गणपतीयार मंदिरात दीड दिवसांचा गणपती उत्सव जल्लोषात साजरा झाला. आता यावर्षीही कुपवाडा व अनंतनाग या आणखी दोन ठिकाणी पाच दिवसांचा गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. पहिल्या वर्षी मानाचा पहिला गणपती कसबा गणपतीची मूर्ती बसविण्यात आली होती.आता यावर्षी अनुक्रमे मानाचा दुसरा गणपती तांबडी जोगेश्वरी, मानाचा तिसरा गणपती गुरुजी तालीम व मानाचा चौथा गणपती तुळशीबाग यांच्या मूर्ती त्यासाठी सुपूर्त केल्या जाणार आहेत. येत्या शनिवारी काश्मीरमधील तिनही मंडळांच्या कार्यकर्त्यांना या मूर्ती प्रदान करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती पुनीत बालन यांनी दिली.

# पार्थ पवार, निलेश लंकेनंतर आता चंद्रकांत पाटील वादात, गुंड गजानन मारणे याने केला सत्कार

**पुणे । प्रतिनिधी**

अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसनंतर आता भारतीय जनता पक्षाचे पुण्यातील कुख्यात गुंड गजानन मारणे उर्फ गजा मारणे कनेक्शन समोर आला आहे. राष्ट्रवादी आणि गजानन मारणे प्रकरण शांत होत नाही तोच भाजप नेते अन् मंत्री चंद्रकांत पाटील यांचा सत्कार गजानन मारणे याने केला आहे. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर भाजप टीका होऊ लागली आहे. यापूर्वी अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचा सत्कार गजानन मारणे याने केला होतो. त्यानंतर शरद पवार गटातील खासदार निलेश लंके याचाही सत्कार गजा मारणे याने केला होतो. त्यावेळी भाजपने निलेश लंके यांच्यावर टीका केली होती.




कुख्यात गुंड गजानन मारणे याने मंगळवारी झालेल्या दहीहंडी कार्यक्रमात मंत्री चंद्रकांत पाटील यांचा सत्कार केला. त्याने पुष्पगुच्छ देऊन चंद्रकांत पाटील यांचे स्वागत केले. गजानन मारणे हा पुण्यातील कोथरूड भागात वास्तव्यास आहे. चंद्रकांत पाटील कोथरूडचे आमदार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत पुन्हा कोथरूडमधून निवडणूक लढवण्याची तयारी चंद्रकांत पाटील यांनी सुरू केली आहे. यापूर्वी या गुंडासोबत भाजपचेही कनेक्शन समोर आल्याने विरोधकांना टीका करण्याची संधी मिळाली आहे. या प्रकारानंतर काँग्रेसचे नेते आणि विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर हल्ला केला आहे. त्यांनी मंत्री चंद्रकांत पाटील आणि गुंड गजानन मारणे यांच्या व्हिडिओ एक्सवर शेअर केला. त्यात 'लाडके गुंड' असे कॅप्शन दिले आहे. मंत्री महोदयांनी पुष्पगुच्छ स्वीकारून गजानन मारणेला हात जोडले, असा चिमटा काँग्रेसने काढला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी काही महिन्यांपूर्वी कोथरूडमध्ये गजा मारणे याची भेट घेतली होती. त्या भेटीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल आले होते. त्यावरुन टीका झाल्यानंतर अजित पवार यांनीही पार्थ यांचे कान टोचले होते. त्यानंतर अहमदनगर लोकसभा मतदार संघातील नवनिर्वाचीत खासदार निलेश लंके यांनी गुंड गजा मारणे याची भेट घेतली. त्याच्याकडून निलेश लंके यांनी सत्कार स्वीकारला होता. त्यावेळी निलेश लंके यांनी गजा मारणे कोण आहे? हे आपणास माहीत नव्हते, असे स्पष्टीकरण दिले होते.

## कोण आहे गजा मारणे


गजानन मारणे हा पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात रहिवाशी आहे. मारणे टोळीचा तो म्होरक्या आहे. त्याच्यावर पुणे पोलीस आणि इतर पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याला पप्पू गावडे आणि अमोल बधे खून प्रकरणामध्ये अटक झाली होती. या प्रकरणात त्याला शिक्षा झाल्यामुळे तो येरवडा कारगृहात होता. मारणे आणि मोहोळ टोळीचा पुण्यात दबदबा आहे.

# अवघ्या १८ दिवसात एकाच वस्तीवर चार बिबटे जेरबंद; नागरिकांमध्ये घबराट

**आंबेगाव । प्रतिनिधी**

वळती (ता. आंबेगाव) येथील बिघेवस्ती-काटवानवस्तीत वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात गुरुवार (ता. २९) पहाटे एक ते दीड वर्षाचा बिबट्या जेरबंद झाला आहे. बिबट्या जेरबंद झाल्यानंतर बिबट मादी येऊन पिंजऱ्याला धडक्या देऊन सोडवण्याचा प्रयत्न करत होती. त्यामुळे परिसरातील नागरिकांना वनविभागाने सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.





एकाच वस्तीवर अवघ्या १८ दिवसात सलग चौथा बिबट्या जेरबंद होण्याची ही पहिलीच घटना घडली आहे. त्यामुळे अजुनही काटवानवस्ती, बिघे वस्तीत बिबट्यांचा वावर असून बिबट्याचे भय काही संपत नसल्याचे चित्र असून नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.

वळती येथील काटवानवस्ती, बिघेमळ्यात अवघ्या १८ दिवसात गुरुवारी पकडलेला हा चौथा बिबट्या ठरला आहे. १२ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास पहिला बिबट्या जेरबंद झाला. त्यानंतर १८ ऑगस्ट रोजी दुसरा बिबट्या, हा एक वर्षाचा नर जातीचा होता. त्यानंतर तिसरा बिबट्या २५ ऑगस्ट रोजी जेरबंद झाला आहे.

या परिसरात बिबट्याचा वावर असल्याने शेतकरी मारुती कारभारी भोर यांनी पुन्हा वनविभागाला पिंजरा पुन्हा लावण्याची मागणी केली होती. त्यानंतर गुरुवार (ता. २९) रोजी पहाटेच्या सुमारास पुन्हा चौथा बिबट मादी बछडा जेरबंद झाला. बिबट्या जेरबंद झाल्यानंतर पहाटेच्या सुमारास मादीने डरकाळ्या फोडत पिंजऱ्याला धडक्या दिल्या.

यावेळी येथील शेतकरी मारुती भोर यांनी बॅटरी लाऊन पाहिले असता, बिबट मादी पिंजऱ्या भोवती घिरट्या घालत होती. घटनेची माहिती मिळाल्यानंतर गुरुवारी सकाळी वनविभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह व वनविभागाच्या रेस्क्यू पथकाने बिबट बछडा मादीला ताब्यात घेतले. यावेळी धोंडीभाऊ भोर, आनंद वाव्हळ, मारुती भोर यांच्यासह वनविभाग अधिकारी कर्मचाऱ्यांसह, ग्रामस्थ उपस्थित होते.

# इंद्रायणी नदीपात्रात आणखी एका महिलेची उडी; शोधकार्य युद्धपातळीवर सुरू

**आळंदी । प्रतिनिधी**

आळंदीच्या इंद्रायणीत गुरुवारी पुन्हा एक महिलेने उडी घेतली आहे. सकाळच्या सुमारास एका व्यक्तीने त्या महिलेस रोखण्याचा ही प्रयत्न केला होता, त्याच व्यक्तीने आळंदी पोलिसांना याची खबर दिली. पीएमपीएमएल बस स्टॉप लगतच्या पुलावरून महिलेने जीव देण्याच्या उद्देशाने उडी घेतलेली आहे. मात्र ही महिला कोण आणि तिने असं टोकाचं पाऊल का उचललं याबाबत अद्याप ही माहिती समोर आलेली नाही. रविवारी गरुड स्तंभावरून महिला पोलीसाने उडी घेत आत्महत्या केली होती. तीन दिवसांच्या शोधकार्यानंतर तिचा मृतदेह काल आढळला त्यानंतर गुरुवारी पुन्हा ही घटना उघडकीस आली आहे. या महिलेचं शोधकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.



या घटनेबाबत स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना आज गुरुवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. इंद्रायणी नदीवरील भक्ती सोपान पुलाशेजारील नव्याने उभारण्यात आलेल्या स्कायवॉक पुलावरून एका महिलेने नदीपात्रात उडी मारली. या घटनेची माहिती तातडीने आळंदी पोलीसांना देण्यात आली, त्यानंतर आळंदी अग्निशमन विभाग पथकाकडून इंद्रायणी नदीत या महिलेचा शोध सुरु आहे. इंद्रायणी नदीला पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यामुळे नवीन पुलाच्या खालच्या बाजूला तसेच अन्य ठिकाणी शोधमोहीम राबवली जात आहे. मात्र अद्याप नदीत उडी मारलेल्या महिलेचे नाव तसेच कारण समजले नाही. आळंदी पोलीस याचा तपास करत आहे.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्याला जामीन

**पुणे । प्रतिनिधी**

१७ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेऊन तिच्यावर बलात्कार केल्याच्या प्रकरणातील आरोपीला ५० हजार रुपयांचा जामीन विशेष न्यायाधीश के. पी. क्षीरसागर यांनी मंजुर केला आहे.

साहिल झडपे (वय २५, रा. गोखलेनगर) असे त्याचे नाव आहे. त्याने ड. अजित पवार व ड. प्रणित नामदे यांच्यामार्फत जामिनासाठी अर्ज केला होता. पीडितेने त्याच्याविरुद्ध उत्तमनगर पोलिसात फिर्याद दिली आहे. त्याने २ जुलै २०२३ ते १४ एप्रिल २०२४ या कालावधीत लग्न करण्याचे आमिष दाखवून तिच्यासोबत वेळोवेळी शरीरसंबंध ठेवले, असे फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे. त्याच्यावर बलात्कारासह बाललैंगिक अत्याचार कायद्याच्या विविध कलमांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला ३० जुलै २०२४ रोजी अटक करण्यात आली होती.

आरोपीतर्फे जामीन मिळावा म्हणून ड अजित पवार व ड प्रणित नामदे यांच्या मार्फत अर्ज दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील फिर्यादीने खोटी तक्रार दाखल केली आहे. पीडित मुलगी १७ वर्षे वयाची आहे. हा प्रकार प्रेमसंबंधातून घडलेला आहे. आमिषातून असे कृत्य केल्यास, त्याचे काय परिणाम होऊ शकतात, हे ती समजू शकते. आरोपीकडून तिच्यावर कोणत्याही प्रकारची जबरदस्ती नव्हती. तसेच पीडिता सज्ञान झाल्यावरही आरोपीसोबत तिचे प्रेमसंबंध होते. ती आरोपीसोबत स्वत: गेली होती, असा युक्तीवाद ड.अजित पवार व ड. प्रणित नामदे यांनी केला. हा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायालयाने जामीन मंजुर केला.

# पुणे महापालिकेतील अभियंत्यांच्या केल्या बदल्या

***पुणे । प्रतिनिधी***

पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागासह अन्य विभागात कार्यरत असणाऱ्या अभियंता श्रेणीतील अधिकाऱ्यांच्या आयुक्त बदल्या करण्याचे आदेश डॉ. राजेंद्र भोसले यांनी काढले आहेत. यामध्ये दोन कार्यकारी अभियंता, तीन उप अभियंता, १० कनिष्ठ अभियंत्यांचा समावेश आहे.




महापालिकेत एका विभागात तीन वर्षा काम केल्यानंतर नियमाप्रमाणे बदली करणे आवश्यक होते. पण काही अधिकाऱ्यांचे पाच सहा वर्ष उलटून गेल्या तरीही बदल्या झालेल्या नव्हत्या. त्यामुळे आयुक्तांनी आदेश काढले आहेत.

कार्यकारी अभियंता बिपिन शिंदे यांची मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती या विभागात बदली करण्यात आली आहे. त्यांच्याकडे २३ गावांच्या सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता रोहिदास गव्हाणे यांची भवनरचना विभागात बदली करण्यात आली आहे.

उपअभियंता पुरुषोत्तम भुतडा आणि आशालता साळवी यांच्याकडे गेली अनेक वर्षा टीडीआर सेलची जबाबदारी होती, त्यांची आता अनुक्रमे मालमत्ता व्यवस्थापन आणि पथ विभागात बदली करण्यात ली आहे. तर भवन रचना विभागाचे उपअभियंता वीरेंद्र टिळेकर यांची बांधकाम विभागात बदली झाली आहे. बदली झालेले कनिष्ठ अभियंता (नवीन नियुक्ती विभाग) - रूपेश वाघ (पथ), स्वाती गालपल्ली (पथ), स्वाती जाधव (अतिरिक्त आयुक्त कार्यालय), हेमंत कोळेकर (पथ), अनुप गजलवार (पाणी पुरवठा), प्रवीण जगताप (विकास योजना), विजय पाटील (विकास योजना), महेश चव्हाण (विकास योजना), महेश शिंदे (नगररचना).

# तलाठी खूनाचा जुन्नरमध्ये निषेध

**आपटाळे । प्रतिनिधी**

हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील आडगावामध्ये एका तरुणाने तलाठ्याची निर्घृण हत्या केल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (ता. २८) घडली. या घटनेच्या निषेधार्थ जुन्नर तालुका तलाठी संघटनेच्या वतीने गुरुवारी (ता. २९) काम बंद आंदोलन केले. यावेळी संघटनेच्या वतीने निवासी नायब तहसीलदार सारीका रासकर यांना निवेदन दिले.

यावेळी मंडलाधिकारी व्यंकटेश भोसले, विद्या नांगरे, राजेश ठुबे, डी. बी. काळे, शीतल गर्जे, प्रल्हाद पाटील, अनिल थोरवडे, राजेंद्र पोटकुले, तलाठी प्रमोद इंगळे, अमर खसाळे, सुनील राणे, शिवाजी जाधव, राजाराम केदारी, भालचंद्र पंडित, विशाल उतळे यांसह तलाठी व महसूल कर्मचारी उपस्थित होते.

# 'खेळातुन व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास'-डॉ. रुपेश थोपटे

**पुणे । प्रतिनिधी**

खेळातुन शारीरिक, मानसिक व भावनिक स्वास्थ्य निर्माण होते. याबरोबरच व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकासही होतो, असे मत डॉ.आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रुपेश थोपटे यांनी व्यक्त केले.



पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या येरवडा येथील डॉ.आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात शारीरिक शिक्षण व क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्तपणे राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

य़ावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रेरणा उमरखेडी होत्या. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.गौतम बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी संपत शिंदे यांच्यासह अन्य प्राध्यापक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

आजची तरुण पिढी टिव्ही, मोबाईलचा वापर करण्यात जास्त गुंतलेली असल्याने त्याचे विपरित परिणामही संबंधित तरुणांच्या मनावर होतात. विद्यार्थ्यांनी नको त्या गोष्टींसाठी वेळा वायाला घालवु नये. शारीरिक क्षमता विकसित करण्यासाठी व्यायाम करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. विद्यार्थ्यांनी आपआपल्या आवडीचे खेळही खेळायलाच पाहिजेत, असे मतेही डॉ. रुपेश थोपटे यांनी व्यक्त केले आहे.

विद्यार्थ्यांनी जिमखाना, क्रीडांगणाचा अधिकाधिक वापर करायला पाहिजे. खेळाच्या माध्यमातुन शासकीय नोकरीची संधी प्राप्त करुन उत्तम करीयर करण्याला विद्यार्थ्यांनी प्राधान्य देण्याची गरज आहे, असे डॉ.गौतम बनसोडे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संपत शिंदे यांनी केले. सूत्रसंचालनसुवर्णा कांबळे यांनी केले. आभार धीरज गडहिरे यांनी मानले.

# टॉवरवरील रिमोट रेडीओ युनीटची चोरी करणारा जेरबंद; ५ लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

मोबाईल टॉवरवर ४ जी नेटवर्कसाठी बसविलेले महागडे रिमोट रेडीओ युनीट चोरी करणाऱ्या एकाला सहकारनगर पोलिसांनी अटक केली. आरोपीकडून ५ लाख ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



दिलशाद मोहमद रफिक (वय ३२, रा. खडी मशिन चौक, कोंढवा, मुळ. रा, उत्तरप्रदेश) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. या गुह्यात यापूर्वी अक्षय शांताराम बोडके (वय २६), अशिष अशोक शिंदे (वय ३९, दोघे, रा. बिबवेवाडी) यांना अटक करण्यात आलेली होती. तर, रफिक हा फरार होता. याबाबत सागर मोरे यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मोरे हे काम करीत असलेल्या कंपनीने धनकवडी व साई कृपा सोसायटी, सहकारनगर येथे टॉवर बसवले होते. या टॉवरवर एका मोबाईल कंपनीने ४ जी नेटवर्कसाठी रिमोट रेडीओ युनीट बसविले. एकूण ९ मशिन्स होत्या. मात्र, मार्च महिन्यात चोरट्यांनी टॉवरवर बसवलेले युनिट चोरून नेले. याप्रकरणी दाखल गुन्ह्यांत पोलिसांनी बोडके आणि शिंदे यांना अटक केली होती. तेव्हापासून रफिक हा फरार होता. दरम्यान दहिहंडी सणानिमीत्त सहकारनगर पोलीस पेट्रोलींग करीत होते. यावेळी एकजण के. के. मार्केट येथील भंगार दुकानाजवळ चोरीच्या रिमोट रेडीओ मशीन विकण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलीस अंमलदार सागर सुतकर यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून रफिकला ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या तपासात त्याने साथीदार बोडके, शिंदे यांच्यासह गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून ५ लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. परिमंडळ दोनच्या उपायुक्त स्मार्तना पाटील, सहायक आयुक्त नंदिनी वग्यानी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक छगन कापसे, गुन्हे निरीक्षक उत्तम भजनावळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक सागर पाटील, बापु खुटवड, सागर सुतकर, खंडु शिंदे, अमोल पवार, महेश मंडलिक, सागर कुंभार, अमित पदमाळे, विशाल वाघ यांनी ही कारवाई केली आहे.